◆ जून २००४
◆ वर्ष चौथे
◆ अंक सहावा

मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

संपादकीय २
साहित्यवार्ता ५
पुस्तक परिचय
दुसरे प्रॉमिथिअस: महात्मा गांधी
संपा: सुनीलकुमार लवटे १८
तो आणि ती : अनु. डॉ. रमा मराठे २२
जीवनयात्रा: अभिनेता दिग्दर्शक
मा.विनायक : भाई भगत २८
पुरस्कार ३४
फुले आणि काटे ३९
श्रद्धांजली ४१
बालनगरी ४३

✠ मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

सुप्रीम कोर्टाचा दिलासा देणारा निवाडा

भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वावर महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० साली झाली. त्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. सर्व मराठी भाषकांचे एकच एक राज्य 'महाराष्ट्र' व्हावे म्हणून विदर्भ - मराठवाडा यांनीही मनाचा मोठेपणा दाखवून आपला मराठी बाणा प्रकट केला. बेळगाव-कारवार वगैरे काही सीमाभाग महाराष्ट्रात समाविष्ट होऊ शकला नाही याचे शल्य आजही आपल्या अंत:करणात धगधगते आहे. मराठी भाषकांचा हा मुलूख - त्यात मराठी ही राज्यभाषा व्हावी, ही आपली मनीषा; आणि राज्यशासन त्या दिशेने हालचाल करून निर्णय घेईल. शासनदरबारी मराठीचा सर्रास वापर सुरू होईल ही आपली अपेक्षा होती. यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री म्हणून त्या दिशेने पावले टाकली. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना, भाषा संचालनातर्फे पदनाम कोशाची सिद्धता, मराठी विश्वकोश निर्मितीचा प्रकल्प, महत्त्वपूर्ण पाश्चात्त्य ग्रंथांचे मराठी अनुवाद वगैरे उपक्रम त्या अपेक्षेच्या दृष्टीने दिलासा देणारे होते. परंतु हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला आणि नंतर राज्यकारभाराची भाषा मराठी होण्याच्या प्रक्रियेलाही खो बसला. आणि आज महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ४४ वर्षे होऊनही राज्यकारभारात इंग्रजीचाच बडेजाव आहे. मराठीचा वापर झालाच तर तो तोंडदेखला आहे. न्यायालयात एखाद्या न्यायाधीशाने मराठीत निकालपत्र लिहिले तर वृत्तपत्रे त्याबद्दलच्या बातम्या कौतुकाने छापतात. मराठी बोलता किंवा लिहिता न आले तरी महाराष्ट्रात विनासायास जगता येते, कामधंदा करता येतो, पदवीचे व पुढचेही शिक्षण मिळवता येते; अशी आजची आपली एकूण कॉस्मॉपॉलिटन थोरवी आहे. सीमाप्रश्नावरती संमेलनात दर वर्षी भाषणे आणि ठराव होतात. राज्यकर्तेही त्याला तोंडी पाठिंबा देतात. पुन्हा वर्षभराने त्या आश्वासनांची तशीच उजळणी होते. मराठी शाळांतही पहिलीपासून इंग्रजी सुरू झाले; मराठी ऐवजी इलेक्ट्रॉनिक्ससारखा स्कोअरिंगचा विषय घेऊन दहावी-बारावी उत्तीर्ण होण्याची सोय झाली; तेव्हा साहजिकच महाराष्ट्रात मराठीला काहीच किंमत उरली नाही. जागतिक मराठी परिषदेच्या व्यासपीठावरून कुसुमाग्रजांनी 'फाटक्या वस्त्रात मराठी आगतिकपणे मंत्रालयासमोर उभी आहे' अशी वेदना प्रकट केली; परंतु त्या पुढच्या वीस वर्षांत मराठीची अवस्था आधीपेक्षाही केविलवाणी होत गेली. आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पेव फुटले. विनाअनुदानित शाळांनी 'मराठी' अभ्यासक्रमाला फाटा दिला. अभ्यासक्रमातून त्याचे उच्चाटन केले.

माध्यमिक शालान्त परीक्षेसाठी तरी मराठी अपरिहार्य असावी अशी मागणी होत राहिली; आणि राज्य सरकारने तसा निर्णय घेतला. 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असणाऱ्या शिक्षणसंस्थांत पाचवीपासून दहावीपर्यंत मराठी भाषा हा विषय सक्तीचा राहील असा आदेश काढला गेला. दिल्लीच्या केंद्रीय शालान्त परीक्षा देणाऱ्यांना अर्थातच हा आदेश लागू नव्हता.

राज्य सरकारचा हा आदेश परभाषक माध्यमिक शाळांच्या संचालक संस्थांना सहजपणे मान्य होईल असा कोणाचाच होरा नव्हता. भरपूर शुल्क घेणाऱ्या धनाढ्य शाळांना मराठीबद्दल काही प्रेम असण्याचेही कारण नव्हते. मुंबई हायकोर्टात महाराष्ट्र शासनाच्या या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिका सिंधू एज्युकेशन सोसायटी वगैरें अल्पसंख्यांकांच्या संस्थांनी दाखल केल्या. मुंबई हायकोर्टाने महाराष्ट्र शासनाच्या बाजूने कौल दिला. तेव्हा चेतन जयेश चौधरी, सिंधू सोसायटी वगैरेंनी सुप्रीम कोर्टात अपीले दाखल केली. सुनावणीच्या वेळी सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने महाराष्ट्र सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा आदेश दिला. नागपूर अधिवेशनात त्यावर चर्चा झाली; आणि मराठीबाबतचे धोरण राज्य सरकारने स्पष्ट करावे असे सभापतींनी बजावले. महाराष्ट्रातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये शालान्त परीक्षेपर्यंत मराठी हा विषय सक्तीचा असलाच पाहिजे असा ठराव साहित्य संमेलनातही मंजूर झाला होता. महाराष्ट्र सरकारने आपली बाजू सुप्रीम कोर्टात व्यवस्थित मांडली. परिणामी सुप्रीम कोर्टाने राज्यसरकारचा आदेश वैध व घटनात्मक ठरवला; त्या विरोधातील याचिका व अपीले फेटाळून लावली. न्या. एस. राजेंद्रबाबू, न्या. ए. आर. लक्ष्मणन आणि न्या. जी. पी. माथूर यांच्या खंडपीठाने महाराष्ट्र सरकारची भूमिका मान्य करून, मराठी हा विषय पाचवी ते दहावीपर्यंत सक्तीचा करण्याची भलावण केली ही मोठी समाधानाची बाब होय. या निर्णयामुळे महाराष्ट्रात राहूनही मराठीशी फटकून राहण्यास सोकावलेल्या उच्चभ्रूंना चांगलीच चपराक बसली आहे.

घटनेने धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकांना आपापल्या धर्माची व भाषेची जपणूक करण्याचा अधिकार दिलेला आहे. त्यामुळे त्याला धार्मिक व भाषिक गटांच्या स्वतंत्र संस्था निघालेल्या आहेत; आणि त्यांच्या शिक्षण संस्था वगैरे चालू आहेत. महाराष्ट्र शासनाने सुप्रीम कोर्टात या संदर्भात एक बिनतोड युक्तिवाद केला, आणि त्यामुळेच सुप्रीम कोर्टाला राज्यसरकारचा आदेश बरोबर असल्याचा निवाडा द्यावा लागला. हा युक्तिवाद काय होता?

'मराठी नको असे या शाळांचे म्हणणे. मातृभाषेव्यतिरिक्त इतर भाषांच्या सक्तीने आमच्या अधिकारावर गदा येते असे पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे म्हणणे. पण हे सर्वजण इंग्रजी या परकी भाषेत शिकतात आणि या शाळांमधूनही ही परकी भाषा शिकवली जाते. इंग्रजी या परकीय भाषेच्या शिक्षणाने त्यांच्या हक्कावर किंवा अधिकारावर गदा येत नाही; तर मग मराठीसारख्या स्वदेशी भाषेने ती का यावी? उलट महाराष्ट्रात बहुसंख्य लोक मराठी बोलणारे; मराठीत व्यवहार करणारे. त्यामुळे त्यांची भाषा येण्याने व्यवहार सुकर होणार...' सुप्रीम कोर्टाने हा युक्तिवाद उचलून धरला आणि राज्य सरकारचा आदेश उचित ठरवला.

या निर्णयामुळे या वर्षी जूनपासून सर्व माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक शाळांमध्ये मराठी हा विषय सक्तीचा होईल; सर्वांना तो शिकावा लागेल. इतर भाषकांना त्यामुळे मराठी शिकावे लागेल; आणि मराठी भाषकांनाही त्यामुळे त्याबद्दल आस्था वाटेल. मराठी भाषेबद्दल आपल्या मनात असलेली मरगळ दूर होईल. मराठी शिकणे, मराठी बोलणे कमीपणाचे हा न्यूनगंड दूर होईल.

परभाषकांना मराठी आत्मसात करणे अधिक सुलभ व्हावे, मराठीबद्दलचे त्यांचे आकर्षण वाढावे अशा प्रकारचे अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके यांची गरज आहे.

इंग्रजीबद्दलचे आज जनसामान्यात असणारे आकर्षण आणि मोडक्यातोडक्या हिंदीतही होत राहणारा संवाद यामुळे मराठीचे 'मऱ्हाट'पण काहीसे निष्प्रभ होत आहे. पुण्यासारख्या शहरातही आता रिक्षावाले मराठीऐवजी हिंदीत बोलताना दिसतात. शाळकरी मुलेही इंग्रजीत बोलतात.

मराठीचे एकूण भवितव्य काय याबद्दल त्यामुळे मन साशंक असले तरी सुप्रीम कोर्टाचा निर्णय मोठा दिलासा देणारा आहे. मराठी साहित्य आणि संस्कृती या दोहोंच्या विकासाला हा निर्णय पोषक ठरणार आहे. राज्य सरकारने न्यायालयीन निर्णयाप्रमाणे आपल्या धोरणाचा दक्षतापूर्वक पाठपुरावा करावा.

समृद्ध वाचनानुभव देणारी नवी प्रकाशने

स्पीडपोस्ट
शोभा डे
अनुवाद
अपर्णा वेलणकर
किंमत २५०रु.

काबुलीवाल्याची बंगाली बायको
सुस्मिता बॅनर्जी
अनुवाद
मृणालिनी गडकरी
किंमत १००रु.

सीमारेषा
माधवी देसाई
किंमत २००रु.

दुसरे प्रॉमिथिअस: महात्मा गांधी
वि. स. खांडेकर
संपादन
सुनीलकुमार लवटे
किंमत ७०रु.

साहित्यवार्ता

* समीक्षक एकापरीने संस्कृतीचाच समीक्षक

''साहित्यातील संगती - विसंगती याचा अन्वय लावणारा समीक्षक हा एकापरीने आपल्या संस्कृतीचाच समीक्षक असतो.'' असे मत मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

पुष्पक प्रकाशनातर्फे प्रा. मधू जामकर यांच्या 'मराठी साहित्य : रंग आणि अंग' या समीक्षाग्रंथाचे प्रकाशन करताना प्रा. जाधव बोलत होते. पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले प्रमुख वक्ते होते.

प्रा. जाधव म्हणाले, ''समीक्षकाने समीक्षा करताना साहित्यातील प्रवृत्ती, अपप्रवृत्ती; तसेच ऱ्हासशीलता यांचे निकष ठरवणे आवश्यक आहे. हे ठरविताना त्याने सांस्कृतिक, सामाजिक संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण साहित्यातला आशय हा सामाजिक स्थित्यंतराशी जोडलेला असतो. त्या अर्थाने साहित्याचा समीक्षक हा संस्कृतीचा समीक्षक असतो. साहित्याच्या निर्मिकाचा दर्जा हा समीक्षकापेक्षा मोठा असतो. समीक्षा हा गंभीर स्वरूपाचा विचारव्यवहार आहे. अशी समीक्षा वाचून केवळ साहित्य अधिक प्रगल्भतेने समजते असे नाही, तर समीक्षेतून आपले आयुष्यच उमगते.''

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''साहित्याविषयीच्या अपार उत्सुकतेपोटी समीक्षक हा समीक्षेकडे वळतो. चांगले, अस्सल दर्जाचे लिखाण हे समीक्षकाला मोह घालते, आव्हान देते.''

कवितेतील मूल्य शोधायला शिकले पाहिजे, असे प्रा. जामकर यांनी सांगितले. प्रकाशक ह. ल. निपुणगे यांनी प्रास्ताविक केले.

* 'मनोरंजन'तर्फे समीक्षा स्पर्धा

मनोरंजन संस्थेने समीक्षकांसाठी घेतलेल्या स्पर्धेत विश्वास सहस्रबुद्धे व विजयचंद्र थत्ते यांची अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या पारितोषिकासाठी निवड झाली.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्य शाखेतर्फे 'संगीत स्वयंवर' या नाटकाच्या प्रयोगावर समीक्षण मागविण्यात आले होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वर्धापनदिनाच्या समारंभात पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

* अनुभवांच्या स्वातंत्र्यानंतर आत्मचरित्राची गरज वाटत नाही.

आपल्याला आलेल्या अनुभवांमध्ये आपल्या कल्पनांचे मिश्रण करून ते शब्दरूपाने मांडण्याची चांगली संधी लेखकाला मिळत असते. हे छान स्वातंत्र्य अनुभवल्यानंतर

लेखकाने आत्मचरित्र लिहिण्याची गरज आहे, असे मला वाटत नाही.'' असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका सानिया यांनी केले.

'रसिक आतंरभारती'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथमहोत्सवामध्ये सानिया यांची श्रीरंग गोडबोले यांनी मुलाखत घेतली. त्या वेळेस विविध प्रश्नांना उत्तरे दिली. आपली लेखक म्हणून झालेली जडणघडण, आपल्या लिखाणाचा परीघ, आपल्या लिखाणाची प्रक्रिया आपल्या लेखन प्रवासात भेटलेल्या गौरी देशपांडे, आशा बगे यांच्याबरोबरच्या आपल्या मैत्रीबाबतही त्या मनमोकळेपणाने बोलल्या. त्याचप्रमाणे एकूण स्त्री लेखकांबद्दल सार्वत्रिकपणे व सरधोपटपणे काही बोलणे अवघड आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले.

त्या म्हणाल्या, ''माझ्या लिखाणातून मध्यमवर्गीय, शहरी व शिक्षित महिलांच्याच व्यक्तिरेखा प्रभावीपणे मांडल्या जातात. कारण माझा परीघ तो आहे. त्या परिघात आयुष्य जगताना विविध अनुभव येत असतात. जे आपल्या अनुभवाला येत नाही, त्याविषयी लिहिणे हा माझ्या दृष्टीने दांभिकपणा आहे. त्यामुळे माझ्या लिखाणातून शहरातील स्त्रीची प्रतिमा अधिक जोरकसपणे दिसते.''

त्या म्हणाल्या, ''स्त्रियांकडून केल्या जाणाऱ्या साहित्यनिर्मितीबाबत सार्वत्रिक अनुमान काढणे अवघड असले तरीही काळाच्या ओघात स्त्रियांच्या लिखाणामध्ये अनेक बदल झालेले दिसतात, कारण समाज बदलतो आहे.

विविध ठिकाणी वास्तव्य केल्यामुळे आपल्या लेखनात येणाऱ्या वेगळेपणाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, ''देशाच्या किंवा राज्याच्या सीमा ओलांडल्या, की आपल्याला स्वत:ची ओळख होते. आपला परीघ विस्तारतो. तेथील माणसांमधील वरवरचे फरक सोडून त्यातील सारखेपणा शोधण्याचा प्रयत्न केला जातो. ती व्यक्ती मराठी नसली तरीही तिचा एकटेपणा, तिची नाती जोडण्याची आस आणि जीवनविषयक जाणिवा या सारख्याच आहेत का, याचाही शोध घेतला जातो. हा अनुभव स्वत:ला समृद्ध करतो. लेखक स्वत:ला अशा पद्धतीने समृद्ध करीत असतानाच वाचकांनीही स्वत:ला समृद्ध केले पाहिजे. अनेकदा वाचन करण्यापूर्वी वाचकांचेही पूर्वग्रह असतात. ते दूर ठेवले पाहिजेत.''

* नवोदित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. सोनग्रा

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेतर्फे जून महिन्यात नवोदित मराठी साहित्य संमेलन होणार असून, त्याच्या अध्यक्षपदी प्रा. रतनलाल सोनग्रा यांची निवड झाली आहे.

* डॉ. नीतू मांडके यांच्या जीवनावरील पुस्तकाचे प्रकाशन

प्रख्यात हृदयशल्यविशारद दिवंगत डॉ. नीतू मांडके यांचे व्यक्तिमत्त्व उलगडून दाखविणाऱ्या 'हृदयस्थ' या त्यांची पत्नी अलका मांडके यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे २३ मे रोजी प्रभादेवीच्या पु. ल. देशपांडे कला अकादमीत प्रकाशन झाले. डॉ. मांडके यांच्या जिद्दी स्वभावाची ओळख करून देतानाच वैद्यक क्षेत्रातल्या बदलांची नोंद त्यांच्या पत्नी अलका मांडके यांनी या पुस्तकात घेतली आहे. पुस्तक 'ग्रंथाली'तर्फे प्रकाशित झाले आहे.

* आठवीपर्यंतच्या सर्व मुलांना मोफत पाठ्यपुस्तके

आठवीपर्यंतच्या सर्व मुलांना पाठ्यपुस्तके मोफत पुरविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याची माहिती शालेय शिक्षण सचिव जयराज फाटक यांनी दिली. नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांनाही मोफत पाठ्यपुस्तके देण्याचा विचार सुरू असून, त्याबाबतचा निर्णय लौकरच घेतला जाईल, असे ते म्हणाले.

पाठ्यपुस्तक मंडळाने या वर्षापासून पाठ्यपुस्तके छापण्याचे काम निविदा पद्धतीने दिल्याने साडेअकरा कोटी रुपयांची बचत झाली. या पुस्तकांचा कागद गुळगुळीत आहे. पुस्तकांची छपाई दर्जेदार असेल, तसेच पुस्तके वेळेवर उपलब्ध होतील, असा दावा त्यांनी केला.

आठवीपर्यंतच्या मुलींना आणि अनुसूचित जाती-जमातीच्या मुलांना सर्व शिक्षण अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्याचा निर्णय गेल्या वर्षापासून अमलात आला आहे. या वर्षापासून बिगर अनुसूचित जाती-जमातीच्या मुलांनाही पाठ्यपुस्तके मोफत देण्यात येतील आणि यासाठी येणारा २५ ते ३० कोटी रुपयांचा खर्च राज्य सरकार उचलेल, असे श्री. फाटक म्हणाले. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना पुस्तके मोफत पुरविण्यासाठीचा आर्थिक बोजा २७ कोटी रुपये असेल.

गेल्या वर्षातील बालभारतीची पाठ्यपुस्तके छापण्याचे काम नोंदणीकृत मुद्रणालयांना दिले जात असे आणि त्याचे दर वाटाघाटींनी निश्चित केले जात होते. परंतु या पद्धतीमुळे इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील पाठ्यपुस्तकांचा छपाई खर्च जादा असल्याचे दिसून आले. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर निविदा मागवून कमी दराच्या मुद्रणालयांना पाठ्यपुस्तकांच्या छपाईचे व बांधणीचे काम देण्याचा निर्णय पाठ्यपुस्तक मंडळाने घेतला. पाठ्यपुस्तकांच्या एकंदर नऊ कोटी प्रती छापण्यात येणार असून, त्यातील एक कोटी ६१ लाख प्रती तयार आहेत. आणखी अडीच कोटी प्रती उपलब्ध होतील. याशिवाय सुमारे दोन कोटी पुस्तके शिल्लक आहेत.

* 'बालभारती'च्या पुस्तक खरेदीवर विक्रेत्यांचा बहिष्कार

पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याच्या निर्णयाचा पुस्तक विक्रेता संघटनेने तीव्र निषेध केला असून, 'बालभारती'च्या पुस्तक खरेदीवर कायमस्वरूपी बहिष्कार घालण्याचा निर्णय घेण्यात आला.

इंग्रजी माध्यम वगळता अन्य सर्व माध्यमांची पहिली ते दहावीपर्यंतची पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयावर विचार करण्यासाठी पुणे पुस्तक विक्रेता संघाची तातडीची बैठक बापू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत पुस्तकखरेदीवर घाऊक व किरकोळ विक्रेत्यांनी बहिष्कार घालावा, तसेच बालभारतीकडे विक्रेत्यांनी चालू वर्षासाठी केलेली नोंदणीही रद्द करावी असे ठरले.

शासनाच्या निर्णयामुळे राज्यातील हजारो पुस्तक विक्रेत्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार असल्याने शासनाच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलनाची तयारी सुरू करण्याचे ठरले.

* ग्रामगीतेच्या प्रसारासाठी धडपडणारे तुकडोजी महाराज

भक्तियोग, ज्ञानयोग आणि कर्मयोग सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठीच संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता रचली, असे प्रतिपादन संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांनी केले. वक्तृत्वोजेक सभेतर्फे आयोजित व्याख्यानमालेत 'संत तुकडोजींची ग्रामगीता' या विषयावर बोलत होते.

सन १९५६ च्या गांधी जयंतीला तुकडोजींच्या ग्रामगीतेच्या हजार प्रतींचे प्रकाशन राज्यातील एक हजार गावांत एकाच वेळी करण्यात आल्याचे सांगून ते म्हणाले की, मराठी साहित्यात असा सन्मान इतर कोणत्याही ग्रंथाला मिळालेला नाही. तुकडोजींनी गावोगाव भ्रमंती करून ग्रामगीता सादर केली. गाव कसे दिसावे, कसे असावे हे गावकऱ्यांना सादर उमजण्यासाठीच तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेचा प्रसार केला. भजनाचा वापर हा केवळ अध्यात्मासाठीच न करता गाव जागृतीसाठी होतो हे त्यांनी दाखवून दिले. विश्वाचा विचार करण्याऐवजी गावाचा विचार केला पाहिजे. आत्मोन्नती ऐवजी ग्रामोन्नतीवर अधिक लक्ष दिले पाहिजे अशी महाराजांची धारणा असल्याचेही त्यांनी सांगितले.

भारताचे पहिले अर्थमंत्री डॉ. सी. डी. देशमुख यांनादेखील तुकडोजींच्या ग्रामगीतेचे महत्त्व पटले होते. आपल्या पहिल्याच अर्थसंकल्पीय भाषणात डॉ. देशमुख यांनी तुकडोजींच्या ग्रामगीतेचा अवलंब करण्याची सूचना केली होती. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. यासाठी ग्रामगीता ही आदर्श आचारसंहिता असल्याचे डॉ. देशमुख यांनी सांगितले. तुकडोजी महाराज हे तुकाराम, रामदासांच्या परंपरेतील प्रवृत्तिवादी संत होते.

* व्यक्तिचित्रणात्मक मुलाखती

पत्रकारितेत व्यक्तिचित्रणात्मक मुलाखत घेणे हे काम सर्वांत कठीण असते, मात्र डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी हा प्रकार यशस्वीपणे हाताळला आहे असे मत ज्येष्ठ पत्रकार ह. मो. मराठे यांनी व्यक्त केले.

सिग्नेट प्रकाशनाच्या वतीने डॉ. मेहेंदळे यांच्या 'चेहरे-मोहरे' या पुस्तकाचे प्रकाशन अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते आणि 'स्मृती-विस्मृती' या पुस्तकाचे प्रकाशन ह. मो. मराठे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. वीणा देव प्रमुख पाहुण्या होत्या.

* आपली स्त्रीशक्तीची परंपरा सहिष्णुतेची

''आपल्याकडील स्त्रीशक्तीची परंपरा ही सहिष्णुतेची, संवादाची आहे. पाश्चात्त्य विचारातील स्त्रीवाद आपल्या भूमीत रुजणारा नाही. तसेच तो स्त्रीच्या उन्नतीला पोषकही ठरणारा नाही.'' असे मत साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी ११ मे रोजी व्यक्त केले.

राणी लक्ष्मी मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त स्मरणिकेचे प्रकाशन 'केसरी' चे मुख्य संपादक, विश्वस्त डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते झाले.

प्रा. जाधव पुढे म्हणाले, ''आपल्या समाजात, कुटुंबव्यवस्थेत स्त्री-पुरुषांमध्ये संवादाचे नाते आहे. समंजसपणा, आपल्या संस्कृतीमध्ये अंगभूत रुजलेला आहे. त्यामुळे पाश्चात्त्य,

आधुनिक स्त्रीवादाची बीजे येथे रुजू शकणार नाहीत. तसेच आधुनिक काळातही स्त्री व पुरुष हे द्वैत न मानता ते परस्परांना पूरक कसे ठरतील ते पाहावे. बदलत्या युगात समाजातील ज्येष्ठांनीही चांगले बदल जरूर स्वीकारावेत. त्याच वेळी नव्या पिढीला आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे महत्त्वही शिकवावे.''

डॉ. टिळक म्हणाले, ''महिलांना स्वावलंबी करण्यात तसेच त्यांना आधार मिळवून देण्यात राणी लक्ष्मी मंडळासारख्या संस्थांचा मोठा वाटा आहे. बदलत्या काळातील स्त्रियांच्या गरजा लक्षात घेऊन मंडळानेही आपल्या कार्यपद्धतीत बदल केला पाहिजे व तरुण कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली पाहिजे.'' संयोजक विश्वस्त कुसुम आपटे यांनी प्रास्ताविक व वसुधा परांजपे यांनी सूत्रसंचालन केले. गौरी रास्ते यांनी आभार मानले.

* चित्रपटाचे यश हे तर्कशास्त्रावर आधारित असते

मानवी मनातील तर्कशास्त्राच्या अपयशामुळेच चित्रपट अपयशी ठरतो. असे प्रतिपादन चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केले. रसिक आंतरभारती आयोजित अनमोल राष्ट्रीय ग्रंथ प्रदर्शनात डॉ. जब्बार पटेल यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम झाला होता, त्यावेळी ते बोलत होते. मुलाखत सुधीर गाडगीळ यांनी घेतली.

'माझा चित्रपटांचा प्रवास हा अन्य सर्वसाधारणपणे प्रेक्षकांप्रमाणेच सुरू झाला. राज कपूरचा 'आवारा' चित्रपट हा मी बघितलेला पहिला चित्रपट होता. त्या काळी मी साहित्यिक, कलाकार, गायक यांचा अगदी जवळून सहवास अनुभवला. तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने मी साहित्याचा चाहता बनलो. शाळेमध्ये पुजारी नावाचे शिक्षक मराठी शिकवायचे. त्यांच्याच प्रेरणेमुळे माझी साहित्याविषयक रुची वाढत गेली' असे डॉ. जब्बार पटेल यांनी सांगितले. या साहित्याच्या प्रेमातूनच आपल्या चित्रपटांच्या निर्मितीमध्ये साहित्याचा संबंध अधिक असल्याचे त्यांनी मान्य केले. पण असे असतानाही चित्रपट आणि साहित्य ही दोन्ही माध्यमे पूर्णपणे वेगळी असल्याचे आपले मत नोंदवण्यास डॉ. जब्बार पटेल विसरले नाहीत. साहित्य आणि चित्रपट यांचा थेट संबंध नसला, तरी साहित्यावर आधारित उत्तम चित्रपट निघू शकतात. पण प्रत्येक चित्रपट हा साहित्यावरच आधारित असावा असा अट्टाहास योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. पटेल यांनी आपल्या जैत रे जैत, सामना, सिंहासन, उंबरठा, मुक्ता, आंबेडकर या चित्रपटांच्या संदर्भातील आपल्या आठवणी सांगितल्या. जैत रे जैतमध्ये गाणी जास्त आहेत, सामनामध्ये संवाद जास्त आहेत अशा आरोपांना आपल्याला तोंड द्यावे लागले. पण नवनिर्मिती करताना काही वेळा अशी कल्पकता दाखवावी लागते. आपला हा 'उर्मटपणा' आता कल्पकता आणि नावीन्यपूर्ण प्रयोगशीलता म्हणून प्रसिद्ध पावला असल्याने तो योग्यच होता अशी टिप्पणीही त्यांनी केली.

डॉ. आंबेडकर यांच्यावरील चित्रपटाबाबत कोलंबिया विद्यापीठात संशोधन सुरू असताना हार्लेम ही काळ्या वर्णाच्या नागरिकांची न्यूयॉर्कमधील वसाहत पाहण्यात आली आणि त्या वसाहतीकडे बघून भारतातील दलितांच्या प्रश्नावर चित्रपट काढण्याचे आपण ठरवले. त्यातूनच 'मुक्ता' या चित्रपटाची निर्मिती झाली, असे त्यांनी सांगितले. भ्रष्टाचार, स्त्रियांची

उपेक्षा, जातीयता असे प्रश्न त्यांनी समर्थपणे हाताळले आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कुसुमाग्रज आणि पु. ल. देशपांडे यांच्यावर अनुबोधपट काढण्यासाठी त्या व्यक्तींच्या कार्यानेच प्रेरणा दिल्याचे डॉ. पटेल यांनी सांगितले. या थोरांच्या कार्याचे मोठेपण चित्रपट माध्यमातून मांडण्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल अभ्यास करणे गरजेचे ठरले. हा एक वेगळाच अनुभव होता. आगामी काळात महात्मा फुले यांच्यावर आपण अनुबोधपट काढणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

* अनमोल ग्रंथोत्सव

ग्रंथवाचन हे मनाची मशागत करणारे ठरत असल्याने त्यास प्रोत्साहन देण्यासाठी पुस्तक प्रदर्शनांची गरज आहे, असे मत प्रसिद्ध साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केले. रसिक आंतरभारती या संस्थेतर्फे आयोजित राष्ट्रीय ग्रंथोत्सवाचे उद्घाटन केल्यानंतर मिरासदार बोलत होते.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य शं. ना. नवलगुंदकर, रसिक प्रकाशनाचे मोरेश्वर नांदुरकर, योगेश नांदुरकर आदीही उपस्थित होते. प्रा. मिरासदार म्हणाले की, कधीही वाचू नयेत अशी आणि कधीही वाचली जात नाहीत अशा दोन गटांत पुस्तकांची विभागणी होत असते. परंतु कधीही वाचू नयेत, अशीच पुस्तके वाचली जातात आणि कधीही वाचली जात नाहीत पण वाचायला हवीत, अशा पुस्तकांच्या कपाटांचे कुलूपही निघत नाही. ही परिस्थिती बदलायला हवी आहे.

ज्ञान ही गूढ कल्पना मानली गेली असून त्याला पुस्तकाच्या रूपाने मूर्त स्वरूप मिळते, असे सांगून प्रा. नवलगुंदकर म्हणाले की, ज्ञानाची प्रतीक्षा करणाऱ्यांना अज्ञानाचे भान असायला हवे. आपण कुठे जात आहोत हे समजले तसेच आपले अज्ञान समजले म्हणजे ज्ञानाची दिशा समजते.

बावीस भारतीय भाषांतील पाच लाखांवर पुस्तकांचा समावेश या प्रदर्शनात करण्यात आला होता. अशा प्रकारचे राष्ट्रीय पातळीवरील हे पहिलेच पुस्तक प्रदर्शन १ ते ९ मे या काळात रमणबाग न्यू इंग्लिश स्कूलच्या पटांगणावर आयोजित करण्यात आले होते. पश्चिम भारतातील विविध ठिकाणी दरवर्षी अशा प्रदर्शनांचे आयोजन 'रसिक आंतरभारती'तर्फे करण्यात येणार असल्याची माहिती नांदुरकर यांनी दिली. युवा पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा प्रदर्शनाच्या आयोजनाचा मुख्य उद्देश होता.

* पुरातन दस्तऐवजांचे जतन आवश्यक

वेदशास्त्राच्या अभ्यासाचे भवितव्य सुरक्षित राखण्यासाठी बिब्लियोग्राफी (संदर्भ, कोश, ग्रंथ भाषांतर) आणि पुरातन दस्तऐवजांचे जतन या गोष्टींवर भर देणे आवश्यक आहे, असे मत संस्कृतच्या अमेरिकेतील अभ्यासक डॉ. लॉरी पॅटन यांनी २ मे रोजी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे प्रमुख डॉ. गणेश थिटे यांच्या षष्ठ्यब्दीच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. भारताबरोबरच, अमेरिका, जपान, जर्मनी आदी देशांतील अभ्यासकांनी संकलित केलेल्या थिटे गौरव ग्रंथाचे प्रकाशन या वेळी करण्यात आले. डॉ. पी. जी. लाळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मैत्रेयी देशपांडे यांनी प्रास्ताविक केले.

पाश्चिमात्य व भारतीय अभ्यासकांमध्ये दुजाभाव राखू नये असे आवाहन करून पॅटन म्हणाल्या की, भारतात संस्कृत परंपरेचा अमूल्य ठेवा आहे.

* मराठीपुढील आजची आव्हाने

मराठी भाषकांच्या करंटेपणामुळेच मराठीची दुरवस्था झाली आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्रांची आजची बिघडलेली भाषा हे देखील त्याचे एक प्रमुख कारण आहे, असे मत 'मराठीपुढील आजची आव्हाने' या विषयांवरील परिसंवादात व्यक्त करण्यात आले.

मराठी साहित्य परिषद आणि मराठी अभ्यास परिषद यांच्यातर्फे या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रा. रा. ग. जाधव होते.

मराठी भाषेच्या विकासाचा मार्गदर्शक नकाशा तयार करता यावा, हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश होता. मराठी अभ्यास परिषदेचे अध्यक्ष डॉ. अशोक केळकर, उपाध्यक्ष प्र. ना. परांजपे, कार्यवाह डॉ. नीलिमा गुंडी आणि तज्ज्ञांनी या चर्चेत भाग घेतला.

रा. ग. जाधव म्हणाले की, मराठी भाषेचे काय होणार हा प्रश्न फक्त मराठी भाषेपुरता नसून सर्वच भाषांची ही समस्या आहे. यासाठी भाषिक व्यवहार म्हणजे काय हे समजावून घेतले पाहिजे. हे केवळ मराठी भाषेवरील आक्रमण नसून आपल्या जगण्यावर, संस्कृतीवर आक्रमण आहे. मराठी भाषा व्यापाराची भाषा झाल्याशिवाय तिला समृद्धी येणार नाही. मराठी माणसाचा अर्थसत्तेत सहभाग नाही. यामध्ये स्वामीत्व मिळविल्याखेरीज मराठीची दखल घेतली जाणार नाही. परभाषिकांच्या लोंढ्यामुळे महाराष्ट्र ग्रासलेला आहे.

'आजच्या मराठीविषयीची माझी प्रतिक्रिया' या खुल्या स्पर्धेत सत्त्वशीला सामंत, शारदा शिंत्रे, शामला वनारसे, सु. वि. जोशी, शरच्चंद्र पानसे, विश्वास देशमुख, रमण चितळे, वंदना भागवत आदींनी भाग घेतला.

* महात्मा फुले यांच्या कवितांचा हिंदी अनुवाद पूर्ण

महात्मा जोतिबा फुले यांच्या पद्य वाङ्मयाचा हिंदी अनुवाद प्राचार्य वेदकुमार वेदालंकार यांनी पूर्ण केला आहे.

राज्य सरकारच्या महात्मा जोतिबा फुले चरित्र साधने प्रकाशन समितीने हिंदी अनुवादाचे काम प्रा. वेदालंकार यांच्यावर सोपविले होते. महात्मा फुले यांच्या 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा', 'अखंडादी काव्यरचना', 'ब्राह्मणाचे कसब' आदी काव्यसंग्रहांचा अनुवाद त्यांनी समितीकडे पाठविला आहे.

* चित्रकाराकडे संवेदनशील मन असण्याची गरज

''चित्रकला हा विषय कठीण आहे, तो कोणी शिकवू शकत नाही. ही कला उपजतच असावी लागते. त्यासाठी चित्रकाराकडे संवेदनशील मन असावे लागते,'' असे मत प्रसिद्ध चित्रकार सुभाष अवचट यांनी व्यक्त केले.

अनमोल राष्ट्रीय ग्रंथोत्सवात मुलाखतीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. निवेदक सुधीर गाडगीळ यांनी त्यांची मुलाखत घेतली.

चित्रकलेच्या अभ्यासक्रमात अपेक्षित बदल न झाल्याचे सांगताना, कला विद्यालयातील अभ्यासक्रमाबाबत गांभीर्याने विचार होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कलेबरोबर कलाकारांची

उपजीविका टिकविता यायला हवी, या दृष्टीने पुण्यातून प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

*** अक्षरांची दुनिया**

'अक्षरमित्र' संस्थेने भरविलेल्या अक्षर महोत्सवात अल्लापासून ओमपर्यंत आणि आईपासून अबकडपर्यंत अनेकविध रूपे रसिकांना बघायला मिळाली. ही अक्षरे जणू संवादच साधत आहेत, असा अनुभव रसिकांना मिळाला.

'कणा'सारखी कविता असो, 'श्रद्धा'सारखा नुसता शब्द असो, 'प्रेमाच्या गावा जावे' हे वाक्य असो, किंवा गाण्याची कुठली ओळ असो, त्यांची किती तरी रूपे अक्षरवेड्या कलाकारांनी रेखाटली आणि अक्षरांवर प्रेम करणाऱ्या रसिकांनी त्यांना मनमोकळी दादही दिली. कागदाबरोबरच शर्ट, पँट, वॉल हँगिंग, पाने, थर्माकोल अशा वेगवेगळ्या गोष्टींवर या कलाकारांनी अक्षरे रेखाटली आहेत. बालगंधर्व कलादालनात हे प्रदर्शन भरले होते. प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी त्याचे उद्घाटन केले. शशांक भालेराव, विनोद पाटील, सागर राऊत, मंगेश कोंडे, धनंजय धोपाटे, कादंबरी शेट्ये, हृषिता देशपांडे, प्रशांती नायडू, रेवती पुराणिक, अमृता देगलूरकर, नम्रता कुपटे यांनी ही अक्षरे रेखाटली आहेत. अच्युत पालव, प्रभाकर भोसले, मनोहर देसाई, विनोद महाबळे यांनी या कलाकारांना मार्गदर्शन केले.

*** मधुशाला निवास : बच्चन यांचे अलाहाबादमधील घर**

''हमारे बाद मेहफिल में अफसाने बयाँ होंगे
बहारें हम को ढूंढेगी न जाने हम कहाँ होंगे ।''

संगमनगरी अलाहाबादच्या मुठ्ठीगंज परिसरातील 'मधुशाला निवासा'त गेले, की मजरूह सुलतानपुरी यांच्या या ओळी सार्थ वाटतात; कारण मधुशाला निवासमध्ये आज सारे काही आहे. हिंदी साहित्यातील अनेक अजरामर ग्रंथ जिथे निर्माण झाले ते टेबल, खुर्ची, स्टूल, पलंग, भांडी आणि तेच कौलारू घर सारे सारे काही आहे; पण ज्यांनी ही निर्मिती केली, ते हरिवंशराय बच्चन मात्र नाहीत. तिथल्या कणाकणात डॉ.बच्चन आहेत, आठवणीतून ते चिरंतन आहेत.

अलाहाबादला गंगा आणि यमुनेचा पवित्र संगम आहे. वर्षभर हजारो भाविक या संगमात स्नान करण्यासाठी मोठ्या भक्तिभावाने येतात, तितक्याच भक्तिभावाने रसिक 'मधुशाला निवास'ला भेट देतात नि स्वत:ला धन्य समजतात; कारण या वास्तूचे महात्म्यच तसे आहे.

या ऐतिहासिक शहराशी नेहरू-गांधी घराण्याचे नाव जसे कायमस्वरूपी जोडले आहे; तसेच बच्चन घराण्याचे. हरिवंशराय यांच्या वडिलांनी सुमारे शंभर वर्षांपूर्वी हे घर खरेदी केले. तिथंच त्यांच्या साहित्यकृती साकारल्या. आयुष्याची बरीच वर्षे त्यांनी 'मधुशाला निवासा'त काढली आणि त्यांच्या साहित्यातून 'मधुशाला' चिरंतन झाली.

आज या घरात अशोक श्रीवास्तव व त्यांचे दोन बंधू किशोर व अनुप राहतात. अशोक म्हणजे हरिवंशराय यांच्या बहिणीचा नातू. बच्चन कुटुंबीयांबद्दल ते भरभरून

सांगतात. हरिवंशराय यांच्या मातुश्री सूरसतीदेवी यांच्या नावाने ते नर्सरी स्कूल चालवितात. 'डॉक्टरसाहेब इथेच बसायचे, इथे फिरायचे, इथे त्यांनी साहित्य लिहिले,' असे येणाऱ्या प्रत्येकाला ते सांगतात. डॉक्टरसाहेब इथे अधूनमधून यायचे, राहायचे; पण नंतर मुंबईला गेल्यावर त्यांचे येणे कमी झाले. वेळ मिळेल, तेव्हा ते येत असत, असे ते म्हणाले. अमिताभचे बालपण इथेच गेले. ते बॉईज हायस्कूलमध्ये शिकत असत. दिल्लीला डून स्कूलला जाण्यापूर्वी ते इथेच होते. अमिताभ इथे कधी येतात का या प्रश्नावर ते म्हणाले, ''१९८४ मध्ये काँग्रेस पक्षातर्फे लोकसभेची निवडणूक लढविली होती, तेव्हा ते आले होते, त्यानंतर नाही. गेल्या वर्षी हरिवंशराय यांच्या अस्थी संगमात विसर्जन करण्यासाठी कलश घेऊन अमिताभ आले होते. घरापासून अवघ्या शंभर फुटावर ते आले. अमिताभ यांना पाहण्यासाठी चाहत्यांची इतकी गर्दी होती, की ते गाडीतून खाली उतरूही शकले नाहीत. ते खाली उतरून घराकडे आले असते, तर चेंगराचेंगरीत काही माणसे जीव गमावून बसली असती. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनीच त्यांना घरात जाण्यास अटकाव केला. या घराला त्यांच्या येण्याची प्रतीक्षा आहे.''

अमिताभ सुपरस्टार असले, तरी 'मधुशाला निवास'ला भारतभर कीर्ती दिली ती हरिवंशराय बच्चन यांनीच. म्हणूनच त्यांचे चाहते अलाहाबादच्या संगमाबरोबरच 'मधुशाला'ला भेट देऊन प्रसन्न होतात.

'आज निछावर कर दुंगा मैं तुझपर जग की मधुशाला'

अशा कविता जिथे साकारल्या त्या मातीला, त्या घराला हरिवंशराय यांच्या आठवणींचा दरवळ आहे. येणारा प्रत्येक जण तिथे सुगंधित होतो. (शिवाजी पाटील,सकाळ)

*** 'संपूर्ण व्यक्तिमत्त्व सुधारणारे जीवनस्पर्शी शिक्षण दिसत नाही.'**

शिक्षण क्षेत्रात प्रेमाचा खडखडाट जाणवत आहे. ज्ञान वाढले; पण शिक्षण मस्तकस्पर्शी झाले. संपूर्ण व्यक्तिमत्त्व सुधारणारे जीवनस्पर्शी शिक्षण दिसत नाही,'' अशी खंत ज्येष्ठ व्यवस्थापनतज्ज्ञ डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणीतर्फे डॉ. शेजवलकर यांचा अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. याच वेळी पोलिस अधिकारी महेंद्र रोकडे यांना 'सामाजिक कृतज्ञता पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित अध्यक्षस्थानी होते.

शिक्षणक्षेत्रात आलेला बाजारूपणा, उथळपणा एक दिवस समाजच दूर फेकेल, असे सांगून डॉ. शेजवलकर म्हणाले, ''शिक्षक हा कल्पवृक्षासारखा असतो. गौतम बुद्धांपासून कर्मवीर भाऊराव पाटलांपर्यंत अनेक आदर्श शिक्षक या समाजात झाले. त्यांच्याकडून प्रेरणा घेत समाजाला शिक्षकांनी भरभरून दिले पाहिजे.''

श्री. रोकडे म्हणाले, ''कायद्याच्या चौकटीत राहून; पण चाकोरीतून बाहेर पडून सामाजिक काम करण्याचा प्रयत्न करीत आहे. पुरस्काराची रक्कम (एकवीसशे रुपये) 'सकाळ रिलीफ फंडा'ला; तसेच तेवढीच रक्कम राष्ट्रीय बंधुता अनाथालयाला जाहीर करीत आहे.''

श्री. दीक्षित म्हणाले, ''समाजात विचारांची मशागत करण्याची ताकद अजून आहे. पण आपली नैतिकता दुसरा कुणी पाहत असला, तर पाळली जाते. त्याऐवजी ती स्वत:च पाळली पाहिजे.''

* लक्षावधी वाचक हीच वृत्तपत्राची खरी ताकद

समाजमन सशक्त करण्याचे व अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे काम वृत्तपत्रे करतात आणि या कामाची ताकद वृत्तपत्राच्या लाखो वाचकांमुळे वृत्तपत्राला मिळते, असे प्रतिपादन 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम यांनी केले.

राणी लक्ष्मी मंडळ सुवर्ण महोत्सव सांगता समारंभ कार्यक्रमात संगोराम बोलत होते. 'प्रसारमाध्यमे आणि समाजमन' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. समाजमन सशक्त होण्यासाठी आणि अन्यायाच्या विरोधात समाजाने संघटित होण्यासाठी वृत्तपत्र हे महत्त्वाचे माध्यम आहे. समाजातील अनिष्ट प्रथांना विरोध करण्याची ताकद एकट्या-दुकट्या नागरिकात नसते. पण अशा लक्षावधी नागरिकांचा सुप्त राग वृत्तपत्राच्या माध्यमातून जेव्हा प्रकट होतो, तेव्हा अन्याय दूर होतो, असा अनुभव असल्याचे संगोराम म्हणाले.

सर्व प्रकारचे दबाव असूनही अन्यायाला विरोध करण्याचे काम वृत्तपत्रे करतात याचे कारण लक्षावधी वाचकांची शक्ती त्यांच्यामागे उभी असते. दूरचित्रवाणीवरील वाहिन्यांचा प्रभाव आणि विविध तांत्रिक क्षेत्रातील प्रगती यांमुळे वाचनाची आवड झपाट्याने कमी होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. समाजमन सशक्त राहायचे असेल, तर वाचनाला पर्याय नाही. वाचनाची आवड कमी झाली, तर आपली विचार करायची शक्तीही कमी होईल, असे ते म्हणाले.

* 'आजचा सुधारक'ची १५ वर्षांची वाटचाल

सर्वसामान्य माणसांचे जगणे आज कठीण होत चालले आहे. त्यांच्या जगण्यात प्रचंड असुरक्षितता आली आहे. विवेकवादाने जगायचे म्हणजे काय, असा त्यांना प्रश्न पडतो अशी खंत ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांनी व्यक्त केली. 'आजचा सुधारक' या नियतकालिकाच्या १५ व्या वर्षातील पदार्पणानिमित्त आयोजित वाचक मेळाव्यात ते बोलत होते.

आज विवेकावर सतत हल्ले होत असल्याचे सांगून ते म्हणाले की, लेनचे पुस्तक असो किंवा सेनचे पुस्तक असो, प्रत्येक गोष्टीचे नको तेवढे राजकारण झाले आहे. डोळे झाकून या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष केल्याशिवाय सामान्यांना जगताच येत नाही. माध्यमातून जे काही समोर येते, त्यातून हाताला काहीही लागत नाही. त्याचा जगण्यासाठी काहीही उपयोगच वाटत नाही. वाचकाने आपली समजूत जागी ठेवून वाचावे, असे काही नसतेच. अशा वेळी 'आजचा सुधारक' मधील जगण्याच्या प्रश्नांविषयीची साध्या, सोप्या भाषेतून होणारी मूलभूत चर्चा मला महत्त्वाची वाटते. मात्र, या नियतकालिकाने अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करायला हवा. या नियतकालिकाच्या वाचकांच्या वतीने हमाल पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव, ज्येष्ठ पत्रकार मुकुंदराव किर्लोस्कर, देवदत्त दाभोळकर आदींनी मनोगत व्यक्त केले.

* कारागृहातील कैद्यांना ५०० पुस्तकांचे वितरण

कारागृहातील बंदीजनांना संतमहंतांचे साहित्य अभ्यासता यावे, संतांच्या विचारांतून भावी आयुष्य जगताना त्यांना मदत व्हावी या उद्देशाने भैय्यू महाराज देशमुख यांच्या सद्गुरू दत्त धार्मिक पारमार्थिक ट्रस्ट, इंदौरच्या वतीने पैठण येथील खुल्या जिल्हा कारागृहाला ५०० पुस्तके शिवाजीराव काळे यांच्या हस्ते वितरित करण्यात आली.

कारागृहाचे प्रभारी अध्यक्ष पी.डी. भालेराव यांनी कारागृहात वाचनालय सुरू करू असे सांगितले.

* स्त्रियांवरील अन्यायाला धर्मग्रंथ जबाबदार

स्त्रियांवरील अन्यायाला धर्मग्रंथ व धार्मिक शिक्षण जबाबदार आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. आर. ए. कडियाळ यांनी केले.

ज्येष्ठ लेखक अनंत तिबिले यांच्या युगानुयुगे या कादंबरीचे प्रकाशन त्यांनी केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघ, आर. के. नगर परिसरच्या उपाध्यक्षा सौ. नलिनी पडळकर होत्या.

ते म्हणाले, भारतातच नव्हे तर साऱ्या जगभरात स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. इजिप्तमध्ये प्राचीन काळात स्त्रियांची खरेदी व विक्री होत होती. भारतावर आर्यांनी आक्रमण केल्यानंतर देशात स्त्रियांवर अत्याचारांना सुरुवात झाली. इंद्र हा आर्यांचा पुढारी होता. त्या काळातील साधूंनी इंद्राकडे स्थानिकांच्या स्त्रिया व गायी जिंकून देण्याची मागणी केली होती. मध्ययुगातही स्त्रियांवरील अत्याचार सुरूच राहिले. आधुनिक काळातही पुरुष हिंदू कोड बिलात मनूच्या कायद्यांचे पालन करण्याचा आग्रह धरतात.स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी स्त्रियांनी स्वत: प्रयत्न करणे आवश्यक आहे, तसेच पाश्चात्यांचे अंधानुकरण करणाऱ्या स्त्रियांवर बहिष्कार टाकावा.

सौ. नलिनी दोशी म्हणाल्या, तिबिले यांनी कादंबरीतून महाभारतकालीन स्त्रियांच्या व्यथा मांडल्या आहेत, पण या व्यथा समकालीन आहेत. त्यांनी केलेले स्त्री मनाचे विश्लेषण हे विचारप्रवर्तक आहे.

सौ. मंजुश्री गोखले म्हणाल्या, महाभारतातील दुर्लक्षित महानायिका गंगा, सत्यवती, अंबाली, गौतमी, गांधारी यांचा मनोव्यापार उलगडताना अध्यात्माचा वापर केला आहे.

तिबिले म्हणाले, लेखक म्हणून उमेदीच्या काळात खूप त्रास सोसावा लागला. सुरुवातीला रहस्यकथा लिहिल्या. शापित राजहंस ही संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित कादंबरी लिहिली त्याचे प्रकाशन अनिल मेहता यांनी केले. त्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी 'युगानुयुगे' ही कादंबरी मेहता यांना समर्पित करीत आहे.

अनिल मेहता यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. कडियाळ यांनी तिबिले यांना सौ. इंदुमती कडियाळ ट्रस्टच्यावतीने एक हजार रुपयांचे पारितोषिक दिले. रा. तु. भगत यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे कार्यवाह दादासाहेब शुक्ल यांनी सूत्रसंचालन केले. नारायण आनंद यांनी आभार मानले. यावेळी चंद्रकुमार नलगे, बा. ग. जोशी, मा. स. पडळकर, मारुतराव वायंगणकर, शामराव साळोखे आदी उपस्थित होते.

* अपर्णा वेलणकर : साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार

कोकणात वाढलेल्या आणि दहावीतही गावाचं नाव बोर्डाच्या यादीत झळकवणाऱ्या अपर्णा वेलणकर हिने डॉक्टरकीची मळलेली मखमली वाट चालण्याचं सोडून पत्रकारितेच्या

अनोळखी जंगलात पाऊल टाकण्याचा निर्णय सोळाव्या वर्षीच घेतला. 'दि गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'च्या अनुवादासाठी तिला मिळालेला साहित्य अकादमी पुरस्कार हा त्या प्रवासातला एक पडाव आहे. कोल्हापूरला कॉलेजात असताना तिला वाटायचं की, 'सायन्स भले आपल्याला जमत असेल; पण आवडत मात्र नाहीये.' अशातच ती 'पुढारी'च्या कार्यालयात गेली. त्यावेळी अठरा वर्षांच्या मुलांना मतदानाचा अधिकार मिळाला होता. संपादक दत्ता सराफ यांनी अपर्णाला त्याबाबत विचारलं. ती बोलल्यावर सराफांनी 'हे लिहून दे' असं सांगितलं. या प्रसंगातून अपर्णाला तिचं बलुतं सापडलं. अपर्णाने बारावीत भरपूर मार्कही मिळवले. पण त्याआधी शेवटचा पेपर देऊन ती 'पुढारी'त दाखल झाली. पत्रकारितेच्या अनुषंगाने नव्यानेच लाभणाऱ्या प्रसिद्धीची झिंग चढण्याच्या काळातच सराफांनी अपर्णाचं लिहिणं वर्षभरासाठी बंद केलं. 'त्यामुळे पत्रकारितेतून येणारं थ्रिल झाडलं तर गेलंच. पण न लिहिण्यातली शक्तीही समजली,'असं ती सांगते. आज ती 'लोकमत'ची फीचर एडिटर आहे. दरम्यान, अनिल मेहतांना शोभा डे यांच्या 'सिलेक्टिव्ह मेमरी'चा अनुवाद प्रकाशित करायचा होता. अपर्णाला काही भाग अनुवादित करून देण्यास त्यांनी सांगितलं. डे यांच्या वडिलांना तो अनुवाद आवडला आणि अपर्णाकडे ते पुस्तक आलं. अनेक लौकिक लाभांबरोबरच झापडबंद मध्यमवर्गीय मानसिकतेतून बाहेर पडून उच्चभ्रू समाजाविषयीचे पूर्वग्रह दूर करता येणं आणि शोभा डेकडून 'ग्लोबल ॲप्रोच' शिकणं ही या अनुवादाची कमाई असल्याचं ती सांगते. पुढे मेहतांनी तिला 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'च्या अनुवादाविषयी विचारलं. त्याला 'बुकर' मिळाल्यावर तिने ते वाचायला घेतलं होतं. पण दहा पानं वाचून ठेवूनही दिलं होतं. अखेरीस तिनंच ते काम केलं. डे यांच्या 'स्पीड पोस्ट' आणि डेबोरा एलिस यांच्या 'ब्रेड विनर'चा अनुवादही तिच्या नावावर आहे. सध्या ती 'ब्रेड विनर'चे पुढचे भाग असलेल्या 'परवाना जर्नी' आणि 'मडसिटी'चा अनुवाद करतेय. अफगाणिस्तानातल्या सामाजिक संघटनांशी संपर्क असणाऱ्या अपर्णाला तिथे जाऊन त्यावर लिहिण्याची इच्छा आहे. ती डॉ. प्रकाश आणि मंदा आमटे यांच्या चरित्रावर काम करतेय.

* अरुण कोलटकर आणि भिजकी वही

साठी-सत्तरीच्या दशकांत सारे मराठी सारस्वत फडके-खांडेकर आणि कुसुमाग्रज-पाडगावकरांच्या साहित्यात मुरत असताना, काही बंडखोर तरुण साहित्यिकांनी राडा केला. पुलंच्या भाषेत बोलायचे, तर अवघ्या लेखकांना डुलकी घेताना या मंडळींनी रंगेहाथ पकडले. नेमाडे, सारंग, चित्रे, तुलसी परब, ढसाळ अशांनी केलेला हा हल्लाबोल प्रखरच आणि मऊशार, गुळगुळीत आणि मध्यमवर्गीय साहित्यविश्वाला न झेपणारा होता. अरुण कोलटकर हे या पिढीचे अग्रणी. नुकताच त्यांचा केशवराव कोठावळे पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तोही दिलीप चित्रे यांच्या 'निष्कलंक' हस्ते. कोलटकरांची 'भिजकी वही' रसिकांच्या हाती सोपवण्याचे काम अशोक शहाणे यांनी केले. साठी-सत्तरीपर्यंत चित्रकला, शिल्पकला आणि कविता यांचा अतूट संबंध सांगता येई. किंबहुना, चित्रकला आणि कविता हे अद्वैतच मानले जाई. अरुण कोलटकर हे या अद्वैताचे ठळक उदाहरण. 'कमर्शियल आर्ट' या शाखेत चमकलेल्या या विद्यार्थ्यांने पुढे जाहिरातींच्या संकल्पना बदलल्या. कमर्शियल आर्टिस्ट गिल्डचा पुरस्कार मिळवणारी, मागणीनुसार जाहिरातींची क्रिएटिव्हिटी आणि कवीची अस्सल मानसी यांचा नैसर्गिक मेळ कोलटकरच घालू जाणोत! त्यांचे काव्यलेखन तसे मोजकेच. साफसुथऱ्या बोलीभाषेत या प्रतिभावंताने दर्शन मात्र विश्वात्मकतेचे घडवले. उघडावाघडा जीवनव्यवहारही करकरीतपणाने मांडला. गुंथर सोन्थायमरशी नाते सांगणाऱ्या त्यांच्या मानसीने 'जेजुरी' इंग्रजीत अशी काही आणली की, राष्ट्रकुलात मराठी कवीचे नाव दुमदुमले. त्यांनी खंडोबा इंग्रजीत नेला; आणि मराठीत स्पिनोझापासून अनेक ग्रीक मिथकांचे संदर्भ पेरले. त्यांची कविता एक प्रांत, देश, धर्म, किंवा भाषेची नाही. एखाद्या 'इराणी रेस्तरां'च्या संगमरवरी मेजावर सुरू झालेला हा प्रवास विग्रहाचे, कलहाचे, संघर्षाचे, तुटलेपणाचे अनेक टक्केटोणपे खात तो 'भिजकी वही' पर्यंत आला आहे. गेली जवळजवळ पन्नास वर्षे हा कवितेचा भंडारा उधळला जातो आहे

* बाळकृष्णलीलाचे प्रकाशन

'सूरदासाच्या नजरेतून बालकृष्णलीला' लेखिका - डॉ. अंशुमती दुनाखे व सुबोध उपनिषद्सार (लेखक - पंडित पुरुषोत्तमशास्त्री फडके) हिंदी अनुवाद - डॉ. अंशुमती दुनाखे नीहारा प्रकाशनच्या या पुस्तकांचे प्रकाशन २९ एप्रिल २००४ रोजी धन्वंतरी सभागृह, पटवर्धन बाग या ठिकाणी झाले. अध्यक्षस्थानी डॉ. स. म. परळीकर होते. डॉ. अशोक कामत प्रमुख पाहुणे होते.

* गोविंद गोडबोले यांच्या ३७ पुस्तकांचे प्रकाशन

कोल्हापूर येथे करवीर वाचन मंदिरात दि. १६ मे रोजी बालसाहित्यकार गोविंद गोडबोले यांच्या ३७ पुस्तकांचे प्रकाशन अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष शंकर सारडा यांच्या हस्ते झाले.शिवाजी विद्यापीठाचे हंगामी कुलगुरू डॉ. चव्हाण अध्यक्षस्थानी होते. बालसाहित्य हे खरे विश्वसाहित्य असते असे सांगून सारडा म्हणाले, ''आजच्या इंटरनेट-संगणक युगाचा प्रतिनिधी असणाऱ्या कुमार नायकाभोवतीची कथा मालिका गोविंद गोडबोले यांनी सिद्ध करावी. ती फास्टर फेणेप्रमाणे लोकप्रिय होईल.

* 'स्वातंत्र्यवीर'चे प्रकाशन

डॉ. मुरलीधर जावडेकर यांनी लिहिलेल्या 'स्वातंत्र्यवीर' या सावकरांवरील चित्रपट कथेचे पुस्तक शंकर सारडा यांच्या हस्ते दि. २८ मे रोजी सुदर्शन हॉलमध्ये प्रकाशन झाले. या पटकथेचे अभिवाचन डॉ. मुरलीधरन जावडेकर आणि सौ. ललिता जावडेकर यांनी केले. डॉ. योगेन्द्र, अभिनव, प्रज्ञा, डॉ. अश्विन, चि. आलाप या जावडेकर कुटुंबियांनी त्यातील गीते सादर केली.

(संपर्क - म्हाडा एचआयजी इमारत १, फ्लॅट ९. तुकाराम नगर, पिंपरी, पुणे १८)

❐



पुस्तक परिचय

दुसरे प्रॉमिथिअसः महात्मा गांधी

लेखक
वि. स. खांडेकर
संपादक
सुनीलकुमार लवटे

खांडेकरांना जाणवलेले महात्मा गांधीजींच्या मोठेपणाचे नानाविध पैलू

महात्मा गांधीजींच्या विषयी वि. स. खांडेकर यांनी प्रामुख्याने १९६९ साली लिहिलेल्या ९ व इतर २ लेखांचा समावेश असलेले 'दुसरे प्रॉमिथिअस' हे पुस्तक गांधींचे विचार व व्यक्तिमत्त्व सम्यक्पणे पेश करते.

मराठीतील नामवंत साहित्यकार भाऊसाहेब खांडेकर यांच्या बहुतेक कादंबऱ्यातून गांधीवादी विचारसरणीचा पुरस्कार करणारी पात्रे आढळतात. १९२७ साली गांधीजींनी वेंगुर्ले या गावाला भेट दिली, तेव्हा खांडेकरांना त्यांचे दर्शन झाले. त्याबद्दल त्यांनी साप्ताहिक वैनतेयच्या १ मार्च १९२७ च्या अंकात गांधींजींचे ओझरते दर्शन हा लेख लिहिला. 'गांधी सम्राट नाहीत; पण सम्राट, सेनापती आणि मुत्सद्दी यांच्या वाट्याला न येणारी लोकांची भक्ती त्यांना लाभलेली आहे.'' असे नमूद करून या चमत्काराचे कारण म्हणून 'दुबळ्या जनतेला गांधीजी माऊलीसारखे वाटतात. कारण तिच्यासाठीच त्यांनी आपण देह वाहिला आहे... आपले हृदय खोलण्याची, ते आहे त्या स्वरूपात मांडण्याची खात्री गांधीजींना आहे... गीतेत वर्णन केलेली दैवी संपत्ती सत्त्वसंशुद्धी, अहिंसा, सत्य हीच त्यांची जिंदगी आहे... गांधीजींचे हृदय क्षीरसागरासारखे असून त्यात तेहतीस कोटी हिंदू हृदयांना जागा आहे... जगातील लोकांची दुःखे पाहून त्यांना मुक्त करण्यासाठी गांधीजींचे हृदय धडधडत आहे...' या गोष्टींचा उल्लेख केला आहे.

गांधींजींच्या विचारांचा प्रभाव खांडेकरांवर पडला. खेड्याकडे चला हा गांधीजींचा संदेश प्रमाण मानून त्यांनी शिरोडा या गावच्या शाळेची सूत्रे स्वीकारली. १९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहाचे ते साक्षीदार होते. त्याबद्दलची वार्तापत्रेही त्यांनी लिहिली होती.

महाराष्ट्रातील पांढरपेशा वर्ग गांधीवादापासून बराच अलिप्त राहत आला आहे; असे १९४४ मध्ये 'अखंड भारत' या पत्रात खांडेकरांनी लिहिले आहे. 'बुद्धीच्या गुलामगिरीमुळे मनुष्यात भावनांची दिवाळखोरी उत्पन्न झाली आहे, हे दृश्य बदलले पाहिजे; शरीरसुख हेच सर्वस्व मानणाऱ्या आधुनिक सुधारणेत मानवाला शांती देण्याचे सामर्थ्य नाही.' हे

गांधींचे मत खांडेकरांनाही मान्य होते. गांधींना आर्थिक मूल्याइतकीच नैतिक मूल्यांचीही महती वाटत होती; आणि ''समाज व्यवस्थेत क्रांती हवी असेल तर आधी त्यागी असा नवा मानव निर्माण करायला हवा, मानवी मनातच क्रांती व्हायला हवी.'' हे त्यांना पटलेले होते. त्यामुळेच वर्तमानकाळ गांधींकडे राजकीय पुढारी म्हणून बघत असला तरी विसाव्या शतकातील मानवी जीवनाचे भाष्यकार म्हणून भविष्यकाळ त्यांना मान देईल, ख्रिस्त, बुद्ध, मार्क्स यांच्या बरोबरीने त्यांचे नाव उच्चारले जाईल असे खांडेकरांनी द्रष्टेपणाने लिहून ठेवले आहे.

'बुद्धीच्या गुलामगिरीमुळे मनुष्यात भावनांची दिवाळखोरी उत्पन्न झाली आहे, हे दृश्य बदलले पाहिजे; शरीरसुख हेच सर्वस्व मानणाऱ्या आधुनिक सुधारणेत मानवाला शांती देण्याचे सामर्थ्य नाही.'

१९६९ मध्ये गांधीजींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने वर्षभरात अनेक ठिकाणी गांधींजीच्या विषयी लिहिण्याची संधी देऊन खांडेकरांनी आपल्या या दैवताला पुन्हा एकदा सर्वांगी न्याहाळले; आणि नव्या पैलूतून जाणवलेले मोठेपण वाचकांपुढे ठेवले. स्वातंत्र्योत्तर काळात जीवनाच्या सर्व क्षेत्रात अधोगती झाली. भ्रष्टाचार, काळाबाजार, सत्ता-संपत्तीचा बडिवार यांचे प्रमाण वाढले याचे खांडेकरांना दुःख होते. गांधींजींचा साधेपणा, स्वदेशीचा आग्रह, साधनशुचिता, नेतृत्वाला यतिधर्माची जोड वगैरे गोष्टी मागे पडत चालल्या याची त्यांना हळहळ वाटत होती. ''गांधीजींना अभिप्रेत असलेली क्रांती दुहेरी होती. भौतिक आणि आत्मिक, तसेच सामान्य मनुष्याच्या परिस्थितीतली आणि मनोधारणेतली.'' असे खांडेकर पुनःपुन्हा सांगतात.

गांधीजींना दक्षिण अफ्रिकेत रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातून फेकून देण्यात आले या प्रसंगाचा उल्लेख गांधीजी 'एक क्रिएटिव्ह एक्सपीरियन्स' म्हणून करीत. अन्याय घडत असताना, आपण काय करायचे? हे असेच चालायचे म्हणून गप्प बसायचे की त्या अन्यायाचे परिमार्जन करून घेण्यासाठी व्यापक संघर्ष उभा करायचा?...बनारस हिंदू विश्वविद्यापीठाच्या उद्घाटनप्रसंगी समोर नटूनथटून बसलेल्या संस्थानिकांच्या दागिन्यांचा उल्लेख करून हा सगळा पैसा शेतकऱ्यांना लुबाडून मिळवलेला आहे; ही लुबाडणूक चालू राहील तर स्वराज्याची आपली तळमळ खरी नाही असे गांधीजी बजावतात. ''गांधीच्या शिकवणुकीतला जो भाग ज्याला पटेल तो त्याने आपल्या नित्य आचरणात आणणे हेच त्यांचे सर्वोत्कृष्ट संस्मरण आहे. आपल्या सदसद्विवेक बुद्धीला कौल लावून माणसाने कृती करावी'' (१४) एवढेच त्यांना हवे होते.

'भौतिक समृद्धीसाठी सर्वजण धडपडत असताना गांधीजी सर्वसामान्य माणसातील सामाजिक धर्मबुद्धी उजळ व निर्मळ राहावी म्हणून प्रयत्नशील होते. (२३)

गांधीजींच्या नंतर समर्थपणे सामाजिक धर्मबुद्धीची बीजे जनमनात फुलवत राहणारा प्रभावी नेता भारताला मिळाला नाही - याची खंत खांडेकरांना वाटते. (२६)

माणसाच्या मनातल्या मांगल्याच्या अग्निकणाविषयी गांधीजींना खात्री होती. लोकपरिवर्तन करणाऱ्याने तो कण विझून जाऊ नये म्हणून दक्ष राहायला हवे; (३१) अशी त्यांची

''गांधींच्या शिकवणुकीतला जो भाग ज्याला पटेल तो त्याने आपल्या नित्य आचरणात आणणे हेच त्यांचे सर्वोत्कृष्ट संस्मरण आहे. आपल्या सदसद्विवेक बुद्धीला कौल लावून माणसाने कृती करावी.''

श्रद्धा होती. त्यांना अभिप्रेत असणारी सामाजिक धर्मबुद्धी ही 'जे का रंजले गांजले' या सामाजिक करुणेवर अधिष्ठीत होती. सामाजिक विचार आणि आचार यात एकवाक्यता पाहिजे हा त्यांचा आग्रह होता.

मानवाला उच्चतर सांस्कृतिक पातळीवर नेणारे गांधीवादाचे क्रांतिकारी रूप स्वातंत्र्योत्तर काळातील भोंदू पुढाऱ्यांमुळे भोंगळ होत गेले आणि गांधीवादाची पीछेहाट सुरू झाली. अर्धकच्चा मार्क्सवाद आणि अर्धकच्चा गांधीवाद यांच्या मिश्रणातून संधिसाधू लोकांनी त्यातले चैतन्य नष्टप्राय केले. (४१)

खांडेकरांना गांधीवाद आणि मार्क्सवाद या दोहोंचा संगम अपेक्षित होता. ही दोन्ही तत्त्वज्ञाने जिवंत, ज्वलंत आहेत; केवळ पुस्तकी नाहीत अशी खांडेकरांची भावना होती. त्यांच्या मानवतावादी वृत्तीला त्यांचे आकर्षण होते. गांधीजींनी विशिष्ट मानवी मूल्यांद्वारे भारतात स्वातंत्र्यप्राप्तीचा अभिनव मार्ग दाखवला; आता तरुणांनी मार्क्सवादाच्या मार्गाने जाऊन सुखी समाधानी समाजाचे स्वप्न साकार करावे असे खांडेकरांना मन:पूर्वक वाटत होते. तसा संदेश ते तरुणांना नित्य देत राहिले. (४१)

महात्मा गांधींना खांडेकर आपले दूरस्थ गुरू मानत. शुचिता, मानवता आणि तेजस्विता यांच्या अपूर्व संगमामुळे गांधीजींच्या व्यक्मित्त्वाचा त्यांच्यावर वीस ते तीस या दशकात प्रभाव पडला. गांधीजींचे काही निर्णय खांडेकरांना रुचले नाहीत; पण तरी गांधींच्या महानतेपुढे ते सदैव नम्रच राहिले. गांधींच्या मोहिनीमंत्राने त्यांना झपाटून टाकले. गांधीजी जन्मभर सत्याचा शोध घेत राहिले. मांगल्याचा शोध घेत राहिले. माणसातल्या पशुत्वावर माणुसकीने मात करावी ही चिंता राजकीय-सामाजिक-आर्थिक चळवळीच्या वेळीही ते अखंड वाहत राहिले. महापुरुषांचा छळ करण्याची मानवी समाजाची दीर्घ परंपरा आहे. खांडेकर त्यासाठी प्रॉमिथिअसचा दृष्टान्त देतात. स्वर्गातून पृथ्वीवर अग्नी आणणारा प्रॉमिथिअस हा एक साहसी पुरुष. परंतु त्याने अग्नी आणला म्हणजे अपराध केला असे ठरवून, त्याला साखळदंडांनी बांधून ओसाड बेटावर राहण्याची शिक्षा फर्माविली गेली. त्याच्या जखमांवर गिधाडे टोचा मारत आणि त्याचा अधिकच अंत पाहत. गांधीजी हे या प्रॉमिथिअसचे वारस आहेत; असा विचार खांडेकर माडंतात, म्हणून या पुस्तकालाही 'दुसरा प्रॉमिथिअस' असे नाव देण्यात आले आहे.

खांडेकर गांधीजींच्या प्रभावाखाली होते; गांधीजींच्या जीवनातील अनेक घटनांचे भाष्यकार होते. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे त्यांना झालेले आकलन आणि त्या तत्त्वज्ञानाला पुढे मिळत गेलेले गौण स्थान - याबद्दल ते विलक्षण अस्वस्थ होते. गांधीवादाला मार्क्सवादाची जोड देण्याची निकड त्यांना भासली. विनोबाजींच्या भूदान पदयात्रेमुळे एक नवी आशा त्यांच्या मनात पल्लवित झाली. परिवर्तनाची पहिली पायरी म्हणून या सामाजिक करुणेच्या अविष्काराकडे

खांडेकर बघतात.

गांधीजींचे मोठेपण खांडेकरांना वेगवेगळ्या प्रकारे प्रतीत होत गेले. 'सामाजिक धर्मबुद्धीचे क्रियाशील भाष्यकार' या लेखात डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. लोहिया, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या निरीक्षणांची नोंद केली आहे आणि आपलीही मते मांडली आहेत.

१. गांधीजी केवळ राजकीय पुढारी, समाजसुधारक किंवा अर्थशास्त्राचा गरीबांच्या भूमिकेतून विचार करणारे पंडित नव्हते. मागच्या चार पिढ्यांचे भारतीय प्रबोधनाचे भिन्न भिन्न प्रवाह त्यांच्या ठिकाणी एकरूप झाले होते.

२. गांधीजींचे व्यक्तिमत्त्व अनेकपदरी होते. कोणाला ते संत वाटले, कोणाला सेनापती.

आत्मशक्तीच्या बळावर, साम्राज्यसत्तेशीही झुंज घेता येणे हा अभूतपूर्व रोमांचकारक अनुभव मनाला आणून देऊन, जनतेला काही काळ निर्भय आणि चैतन्यपूर्ण बनवले.

३. गांधीजींनी केलेल्या प्रबोधनाचे साध्य व साधने आधीच्या नेत्यांच्या साध्य-साधनांपेक्षा वेगळी होती.

४. युद्ध, संघर्ष, अज्ञान, दारिद्र्य, विषमता, रूढिबद्धता या गोष्टी मानवी जीवनात अटळ आहेत असे त्यांनी क्षणभरही मानले नाही. वंश, जात, धर्म, वर्ण, वर्ग आणि श्रीमंती-गरिबी या भिंती जमीनदोस्त करून द्वेष, स्पर्धा, आंधळा स्वार्थ यांची जागा प्रेम, करुणा, सहकार आणि परोपकार घेतील तरच हे जग सुखी होईल अशी त्यांची धारणा होती.

५. स्वर्ग, नरक, वैयक्तिक मोक्ष यासारख्या कल्पनांना त्यांच्या तत्त्वज्ञानात जागा नव्हती. धर्मग्रंथात प्रतिपादन केलेली तत्त्वे निराळी आणि माणसाच्या दैनंदिन जीवनातला जीवनक्रम निराळा हे त्यांना मान्य नव्हते. धर्म व व्यवहार यातले अंतर कमी करण्याचा प्रयत्न करून त्यांनी भारतीय सामाजिक जीवनात नवे वळण लावले. सामाजिक धर्मबुद्धी जागृत केली.

६. आत्मशक्तीच्या बळावर, साम्राज्यसत्तेशीही झुंज घेता येणे हा अभूतपूर्व रोमांचकारक अनुभव भारतीय मनाला आणून देऊन, जनतेला काही काळ निर्भय आणि चैतन्यपूर्ण बनवले.

७. स्वातंत्र्यलढ्यात नि:शस्त्र प्रतिकाराचे साधन त्यांनी वापरले. अहिंसा, अपरिग्रह यासारख्या अवघड व्रतांचा नव्या समाजरचनेसाठी त्यांनी पुरस्कार केला.

खांडेकरांनी गांधींबद्दल वेळोवेळी लिहिलेले लेख एकत्र करून, त्यांच्या गांधीविषयक मूल्यमापनाची प्रमुख सूत्रे जाणून घेणे सोपे केल्याबद्दल संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांना धन्यवाद देणे आवश्यक आहे.

पृष्ठे : १०८ ● किंमत : ७० रु. ● सभासदांना : ५५ रु. ● पोस्टेज : २० रु.

तो आणि ती

लेखक
जॉन ग्रे

अनुवाद
डॉ. रमा मराठे

पति आणि पत्नी यांच्यात संघर्ष का होत असतो याची एक विस्मयकारक मीमांसा

'तो आणि ती' हे अनुवादित पुस्तक म्हणजे पति आणि पत्नी, स्त्री आणि पुरुष यांच्या नात्याला नवा आशय देणारी नवी गीताच आहे.

१९९२ साली अमेरिकेत 'मेन आर फ्रॉम मार्स, वुमेन आर फ्रॉम व्हीनस' अशा लांबलचक नावाचे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि त्याने एकच खळबळ माजवली. स्त्री-पुरुष समानतेच्या जमान्यात स्त्री आणि पुरुष हे मूलत:च प्रकृतीच्या दृष्टीने भिन्न आहेत; त्यांच्या मूलभूत दृष्टिकोनातच फरक आहे; हे लक्षात न घेतल्याने स्त्री-पुरुषांमध्ये अकारण ताण निर्माण होऊन, वैवाहिक जीवनातील आनंद लुप्त होतो; असा सिद्धांत या पुस्तकात मांडला.

पुरुष हे मंगळ ग्रहावरून आले आहेत तर बायका या शुक्र ग्रहावरून - असे प्रतिपादन करून, या दोघांतील वेगळेपण अपरिहार्य आणि अटळ आहे हे वाचकांच्या मनावर बिंबवण्यासाठी लेखक डॉ. जॉन ग्रे याने युक्तिवादांची एक मालिकाच उभी केली.

मंगळावरचा पुरुष आणि शुक्रावरची स्त्री - या दोघांची गाठ पडली पृथ्वीवर! आणि हौशी संसाराच्या जादूभरल्या आरंभीच्या पर्वात त्यांना स्मृतिभ्रंश झाला, त्यांना आपण वेगवेगळ्या ग्रहांवरून आलो आहोत, एकमेकांच्या प्रेमात पडलो असलो तरी आपण वेगळे आहोत, आपल्या भावना, आवडीनिवडी, अग्रक्रम भिन्न आहेत याचा विसर पडला आणि त्यांनी एकमेकांना बदलण्याचा चंग बांधला.

स्त्रीला वाटू लागले - नवऱ्याने माझ्या पद्धतीप्रमाणे वर्तन करावे, पुरुषाचे म्हणणे - बायकोने माझ्या तालावर नाचावे. त्यातून वादळाला सुरुवात झाली. कारण आपण जसे आहोत तसेच वागणार; केवळ दुसरा कोणी सांगतो म्हणून त्याच्या तालावर नाचावे ही अशक्य कोटीतली अपेक्षा आहे.

पुरुष मंगळावरून आला याचा अर्थ काय?

मंगळनिवासी हे शक्ती, यश, कर्तृत्व, कार्यक्षमता यांचे उपासक. आपल्यातील या

गुणांचा त्यांना अभिमान. ते सतत प्रकट करण्याची हौस. योग्यता, पात्रता, परिणामकारकता, कार्यकुशलता यातूनच आपली अस्मिता, आपली महत्ता, आपली ओळख व आत्मप्रतिमा प्रकट होते असा त्यांचा दृढ विश्वास. व्यक्ती आणि भावना यांच्यापेक्षा त्यांना वस्तू आणि तंत्र यात जास्त रस. यंत्रे, संगणक, तंत्रज्ञान वापरण्याची कुशलता, उद्दिष्टपूर्तीसाठी कार्यरत राहणे ही त्यांच्या अस्तित्वाची मूळ बैठक. त्यातूनच आपले कर्तृत्त्व व कार्यप्रवणता यांचा आविष्कार होतो, आत्मसन्मान वाढतो, स्वत:बद्दल कृतार्थता वाटते. ''तू असं कर, तसं करू नको'' असे कोणी सांगितले तर तो त्याला अपमान वाटतो. आपल्याला हे काम जमत नाही, हे त्याला इतर कोणी सांगितलेले रुचत नाही. त्याने तो दुखावला जातो.

स्त्रीला वाटू लागले - नवऱ्याने माझ्या पद्धतीप्रमाणे वर्तन करावे, पुरुषाचे म्हणणे - बायकोने माझ्या तालावर नाचावे. त्यातून वादळाला सुरुवात झाली.

स्वत:च्या समस्या तो स्वत: हाताळतो. दुसऱ्या कोणाचा सल्ला घेणे त्याला सहसा आवडत नाही. अनाहूतपणे कोणी सल्ला दिला तर त्याला चीड येते.

''ही गोष्ट मी एकटा करू शकतो. दुसऱ्या कोणी त्यात पडण्याचे कारण नाही. उगाच सल्ला देण्याचे कारण नाही. आपण कार्य सिद्धीस नेण्यास 'समर्थ' आहोत.'' ही त्याची दृढ भावना.

आणि शुक्रावरून आलेली स्त्री - ती कशी असते? ती कशाला महत्त्व देते?

शुक्रनिवासिनी स्त्री. प्रेम, संवाद, नातीगोती, सौंदर्य या गोष्टींना महत्त्व देते. ती भावनेला महत्त्व देते. नात्यांना महत्त्व देते. एकमेकांना सावरणे, आधार देणे, मदत करणे, संगोपन करणे यासाठी त्या हवा तेवढा वेळ देतात. त्यांची स्वत्वाची जाणीव ही भावना, भावबंध, नातेसंबंधाची जपणूक यांच्याशी जोडलेली असते. सहानुभूती, संवाद साधणे, सुखदु:खात सहभागी होणे, माया लावणे, आस्था बाळगणे यात तिला रस असतो.

कार्य, कृती, तंत्र यापेक्षा स्त्रियांना नातेसंबंध महत्त्वाचे वाटतात. ध्येयप्राप्ती, यश, कीर्ती यापेक्षा या स्त्रियांना भावनिक देवघेव जास्त महत्त्वाची वाटते. त्यातून त्यांना अतीव समाधान लाभते.

स्त्रीच्या या भावनिकतेचे, सहानुभूतीचे, संवादाचे आकर्षण पुरुषाला अगम्य, अनाठायी वाटते. बिनमहत्त्वाचे वाटते.

स्त्रियांना आपले कर्तृत्व, यश, ध्येय हे सिद्ध करण्यापेक्षा आपला प्रेमळपणा, आपली सहानुभूती, आस्था, चांगुलपणा या गोष्टी व्यक्त करण्याची जास्त महती वाटते. पालनपोषण, व्यक्तिविकास, अध्यात्म, वैद्यक, पाककला यात स्त्रीला आनंद वाटतो; दुसऱ्या व्यक्तीच्या भावनिक गरजांची अटकळ बांधणे तिला सहज जमते. न मागताही मदतीसाठी ती धावून जाते. सल्ला देते, उपदेश करते, सांत्वन करते.

असा न मागता सल्ला जर बायकोने पुरुषाला दिला तर तो अस्वस्थ होतो. आपण अकार्यक्षम, अक्षम, नालायक आहोत असे आपली बायको समजते आणि म्हणून असे

कार्य, कृती, तंत्र यापेक्षा स्त्रियांना नातेसंबंध महत्त्वाचे वाटतात. ध्येयप्राप्ती, यश, कीर्ती यापेक्षा या स्त्रियांना भावनिक देवघेव जास्त महत्त्वाची वाटते. त्यातून त्यांना अतीव समाधान लाभते.

शहाणपणाचे डोस पाजते हे त्याला अपमानास्पद वाटते. उलट आपण मदत करतो आहोत या भावनेने बायकोचा आत्मगौरवाचा भाव दुणावतो. सूचना देणे, सल्ला देणे हे स्त्रीला आस्था प्रकट करण्याचे सूचक वाटते. प्रेम, सहानुभूती व्यक्त करण्याचे साधन वाटते.

सल्ला, सूचना देऊन एखादी स्त्री जेव्हा पुरुषाला सुधारू पाहते तेव्हा तिचा समज असतो - मी नवऱ्याला अधिक कर्तृत्ववान, कार्यक्षम बनवते आहे. आपल्या सल्ल्यामुळे तो अपमानित होतोय हे तिच्या लक्षातच येत नाही. नवऱ्याला दुखवावे असे तिच्या मनात नसते. पण तो दुखावला जातो.

मी माझं उद्दिष्ट साध्य करू शकतो, मी माझं काम पूर्ण करू शकतो. माझ्या क्षमतेवर अविश्वास का दाखवितेस? तंत्रज्ञान, यंत्र, कार्यपूर्तता - यात माझा हात धरणारा कोणी नाही; हे तिने स्वीकारावे; उपदेश देत बसू नये ही त्याची अपेक्षा; पण नकळत ती त्याला डिवचते. तो दुखावतो.

मंगळनिवासी पुरुष आणि शुक्रनिवासिनी स्त्री यांच्या या मूलभूत प्रकृतिभेदामुळे त्यांच्या संबंधात तणाव निर्माण होतो.

हे या पुस्तकाचे मूळ सूत्र.

ते पहिल्या दोन प्रकरणांत स्पष्ट केले गेले आहे.

ते नीट समजावून घेतले तर या पुस्तकातील पुढचे विवेचन आपल्याला बहुमोल मार्गदर्शन करू शकेल. एका दृष्टीने हे पुस्तक म्हणजे एक 'कार्यशाळा' आहे. विवेचनानुसार कृती करीत राहिले तर त्याचा फायदा होईल. संसारातले ताणतणाव संपू शकतील.

त्यासाठी पुरुषाने काय करायला हवे?

स्त्री अस्वस्थ असताना तिला समस्या निवारणाचे उपाय सुचवून पुरुष तिची मन:स्थिती बदलू पाहतो. त्यामुळे स्त्री भावनिक दृष्ट्या दुबळी बनते. पुरुष तिचं बोलणं निरुपयोगी ठरवतात; ती अस्वस्थ का आहे याचे स्पष्टीकरण तिलाच सांगतात. तिची मन:स्थिती बदलू पाहतात. हे सर्व करण्याऐवजी पुरुषाने काहीही न बोलता फक्त आस्थेने, सहानुभूतीने ऐकण्याची सवय लावून घ्यावी. ही सवय लागली की जादूची कांडी फिरल्यासारखी स्त्री बदलते. शांत होते. त्याच्याबद्दल कृतज्ञता बाळगू लागते. प्रेमादर व्यक्त करू लागते.

स्त्रीने काय करायला हवे?

पुरुषाला त्यानं विचारल्याशिवाय सूचना देणे, सल्ला देणे, टीका करणे ही कामे स्त्री करते. ती त्याला सुधारू पाहते. त्याला हा उपदेश म्हणजे अवहेलना, अविश्वास वाटतो. त्याला चुकांतून शिकणे नको असते. फक्त मूक स्वीकार, सहकार्य हवे असते. तेव्हा स्त्रीने आपण शुक्रनिवासिनी आहोत, आपण त्याला उगाच उपाय सुचवत राहतो, हे टाळायला हवे हे समजून घ्यावे. पुरुष आपल्या सुधार समितीच्या विरोधात उभा राहणार

- हे लक्षात घेऊन तो मोहच आपण टाळावा. त्याला सल्ला न देता त्याचा स्वीकार करा.

पुरुष तुमच्यातील या बदलाचे स्वागत करील. तुमच्या इच्छा, तुमची मतं याबाबत आस्था दाखवू लागेल.

ऐकून घेणे आणि सूचना न करणे ही पथ्ये अनुक्रमे पुरुषाने व स्त्रीने पाळली तर संसारातला बराच संघर्ष टाळता येईल. जीवन सुखमय, समंजस होईल.

हे मूळ प्रमेय.

त्याकडे वेगवेगळ्या दृष्टींनी बघून त्याचे विश्लेषण या पुस्तकात विस्ताराने करण्यात आले आहे.

एका दृष्टीने पुरुषाची व स्त्रीची मानसिकता समजून घेण्याची ही प्रक्रिया आहे.

ऐकून घेणे आणि सूचना न करणे ही पथ्ये अनुक्रमे पुरुषाने व स्त्रीने पाळली तर संसारातला बराच संघर्ष टाळता येईल. जीवन सुखमय, समंजस होईल. हे मूळ प्रमेय.

दुसऱ्या दृष्टीने पुरुषाची व स्त्रीची भाषा वापरण्याची भिन्न रीत समजून घेण्याची ही प्रक्रिया आहे.

ही भाषा स्त्री व पुरुष कशी वापरतात याची काही मार्मिक उदाहरणे पाचव्या, सातव्या व नवव्या प्रकरणात दिली आहेत.

पुरुष व स्त्री एकच शब्द वापरतात; पण तो वेगवेगळ्या अर्थाने वापरतात आणि तो शब्द वेगवेगळ्या प्रकारे समजून घेतात. त्यामुळे दोघांमधला संवाद साधण्याऐवजी तणावच वाढतो. तिला वाटते, आपल्या नवऱ्याला आपल्या भावनांची पर्वाच नाही. त्याला वाटते, ती आपल्याला दोषी धरून आपल्यावर ठपका ठेवत आहे. स्त्री आपले मन मोकळे करू पाहते; पण त्याला वाटते ही आपल्याविरुद्ध तक्रारीचा पाढा वाचत आहे. पुरुषाला दोषी वाटू नये अशा प्रकारे आपल्या भावना व्यक्त करायला स्त्रिया शिकल्या तर तुमचं जग बदलून जाईल असं डॉ. जॉन ग्रे सांगतात.

स्त्री आपल्या भावना व्यक्त करताना कशाप्रकारचे कोणते शब्द वापरते याची काही उदाहरणे पाहिली तर, तिच्या भाषावापराचे वैशिष्ट्य ध्यानात येईल.(१२९)

तिला असं वाटतं/भावना -	**ती असं बोलते/तिची उक्ती**
१. व्यथित	१. बाई गं, अजून किती काम करायचंय.
२. असुरक्षित	२. मला अजून काहीतरी हवं आहे
३. चिंता	३. पण कशाची? पण कशासाठी
४. संताप	४. मीच सर्व करते. मलाच सारे काही करायला लागतं
५. दमलेली/थकलेली	५. मी आता काहीही करू शकणार नाही.
६. निराश	६. काय करावं हेच समजत नाही मला.
७. नापसंती/नाराजी	७. तू विसरलास तरी कसा ?
८. आग्रही/हेकेखोर	८. तूच हे करायला हवं.
९. अविश्वास	९. तुला नेमकं काय करायचं?
१०. अधिकार चालवणे	१०. म्हणजे? तू केलंस तर हे?

तो म्हणतो,''मी केलेलं काहीही हिला पसंत पडत नाही. मी सर्व काही करतोय. पण हिचं माझ्यावर प्रेमच नाही. माझ्या प्रेमाचा काय उपयोग?''

स्त्री आणि पुरुष यांच्या प्रेमविषयक मूलभूत गरजा समान असल्या तरी त्यांचे प्राधान्यक्रम भिन्न असतात, असे डॉ. जॉन ग्रे यांना वाटते. ते त्या गरजांचे दोन भागात वर्गीकरण करतात.(१४९)

स्त्री	पुरुष
१.आस्था/काळजी/सुरक्षितता	१. विश्वास
२.समजूतदारपणा	२. स्वीकार
३.आदर	३. कृतज्ञता
४.निष्ठा	४. कौतुक/प्रशंसा
५.समर्थन/खात्री	५. मान्यता
६.धीर/दिलासा	६. प्रोत्साहन

म्हणजे -

१. पुरुषाला विश्वास हवा असतो, स्त्रीला सुरक्षितता हवी असते.
२. पुरुषाला स्वीकार हवा असतो, स्त्रीला समजूतदारपणा हवा असतो.
३. पुरुषाला कृतज्ञता हवी असते, स्त्रीला आदर हवा असतो.
४. पुरुषाला प्रशंसा हवी असते, स्त्रीला निष्ठा हवी असते.
५. पुरुषाला मान्यता हवी असते, स्त्रीला समर्थन/खात्री हवी असते.
६. पुरुषाला प्रोत्साहन हवे असते, स्त्रीला धीर/दिलासा हवा असतो.

पतिपत्नीचं एकेमकांवर प्रेम असूनही त्यांचं वैवाहिक जीवन मात्र अनेकदा अपयशी ठरते; दु:खमय असते. असे का होते?

स्त्रीच्या मूलभूत भावनिक गरजा कोणत्या? तर काळजी घेतलं जाणं. तिला समजून घेतलं जाणं वगैरे.

आपल्या ज्या गरजा आहेत त्याच गरजा पतीच्या आहेत असे ती समजते, आणि त्याची खूप काळजी घेते. परंतु तिच्या या काळजी घेण्यामुळे पतीला वाटते, हिचा आपल्यावर विश्वासच नाही. विश्वास दाखवला जाणं ही त्याची मूलभूत गरज आहे. काळजी घेतली जाणं ही नव्हे हे तिच्या लक्षात येत नाही. तो तिच्या काळजी घेण्याबद्दल काहीच सकारात्मक प्रतिक्रिया दाखवत नाही तेव्हा तिला आश्चर्य वाटते. राग येतो.

हेच पुरुषाच्या बाबतीतही घडते.

सहजप्रेरणेने आपल्याला जे हवं असतं तेच आपल्या जोडीदारालाही हवंय असं समजून आपण देतो; पण जोडीदाराला ते नकोच असतं. एकूण दोघं एकमेकांच्या भावनिक गरजांची पूर्तता करण्याबाबत कुठंतरी कमी पडतात. त्यांच्यातला दुरावा त्यामुळं वाढू लागतो. संवाद संपत जातो. तिची तक्रार सुरू होते. ''नेहमी मीच करत राहायचं. पण त्याचं त्याला काही कौतुकच नाही. माझं त्याच्यावर खूप प्रेम आहे. पण त्याचं माझ्यावर अजिबात प्रेम नाही.''

तो म्हणतो, ''मी केलेलं काहीही हिला पसंत पडत नाही. मी सर्व काही करतोय. पण हिचं माझ्यावर प्रेमच नाही. माझ्या प्रेमाचा काय उपयोग?''

अशी निरिक्षणे या पुस्तकात सर्वत्र विखुरलेली आहेत; आणि अनेक उदाहरणे देऊन त्यांच्यावर स्पष्टीकरणात्मक भाष्यही दिलेले आहे. पुस्तकाचा अनुवाद करताना मराठी वाचकांना अडखळल्यासारखे वाटू नये म्हणजे भारतीय उदाहरणे, भारतीय नावे (उदा. प्रवीण, रश्मी, बीना, हेमंत, स्वाती इ.) वापरली आहेत. त्यामुळे इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद आपण वाचतोय असे कुठेही जाणवत नाही. मूळ पुस्तकाच्या ....लेखनासाठी डॉ. जॉन ग्रे यांनी खूप परिश्रम घेतले आहेत, हे स्पष्टच आहे.

आपल्याला काय हवे, जोडीदाराला काय हवे, जोडीदाराला समजून कसे घ्यावे याबद्दल अनेकविध पातळ्यांवरून अंतर्मुख करायला लावणारे हे पुस्तक पतिपत्नीच्या,स्त्री-पुरुषाच्या नात्याला एक नवे अधिष्ठान देईल.

स्त्रीकडून गुण मिळवण्याचे १०१ मार्ग (पृष्ठ २१४-२२१), पुरुषांकडून गुण मिळवण्याचे २६ मार्ग (२४०-२४२), अप्रिय भावना व्यक्त करण्याचे मार्ग (प्रेमपत्र, प्रतिक्रिया व्यक्त करणे, पत्रांची देवाणघेवाण, मिनी लव्ह लेटर्स, आपल्या खऱ्या भावना आपण कशा लपवितो? (२८२-३), सहकार्य कसे मिळवावे? काही मागायचे असेल तर ते कसे मागावे? (२९४-९५), पुरुषाला प्रेरित करण्याची पाच गुपितं (अचूक वेळ, आग्रह-हट्ट-हक्क यांची भाषा न वापरणे, थोडक्यात सांगणे, स्पष्ट सांगणे, योग्य शब्दात सांगणे) (२९८), स्त्री अप्रत्यक्षपणे अपेक्षा व्यक्त करते तेव्हा पुरुष काय ऐकतो? (३०१-२), पुरुषाला कोणत्या प्रकारची शब्दयोजना आवडते? (३०४-३०८) वगैरे भाग हा एका परीने एकमेकांच्या मानसिकतेचे अंत:प्रवाह जाणून घेण्यासाठी घेतलेल्या चाचणीसारखा आहे. तो अंतर्मुख करणारा आहे.

पतिपत्नी यांच्यातील प्रेम व संवाद यांना महत्त्व व मोल आहे. सुखी वैवाहिक जीवनासाठी त्यांची गरज आहे. परंतु दोघांच्या नैसर्गिक प्रवृत्ती भिन्न असल्याने त्यांच्यातील संवादात व्यत्यय येतो. त्यामुळे प्रेमाऐवजी गैरसमज वाढतात. दुरावा वाढतो. ताणतणाव वाढतात. एकमेकांवर प्रेम असूनही सहजीवन, घरगुती जीवन ही एक शिक्षा वाटते....आपल्याला काय हवे, जोडीदाराला काय हवे, ते कसे घ्यावे, कसे द्यावे, जोडीदाराला समजून कसे घ्यावे याबद्दल अनेकविध पातळ्यांवरून अंतर्मुख करायला लावणारे हे पुस्तक पतिपत्नीच्या, स्त्री-पुरुषाच्या नात्याला एक नवे अधिष्ठान देईल. तुमच्या वैवाहिक जीवनाच्या रेताड वाळवंटात ओॲसिसची चैतन्यपूर्ण हिरवाई आणील. तुम्ही नवविवाहित असाल तर या पुस्तकाच्या वाचनाने तुमच्या भावी जीवनाचा पाया समंजस, सौजन्यावर भक्कम उभा राहील. मध्यमवयीन असाल तर वैवाहिक जीवनात आलेल्या कंटाळ्याला, उद्वेगाला हद्दपार करता येईल आणि जीवनात नवा आनंद बहरेल.

पृष्ठे : ३५२ ● किंमत : २५० रु. ● सभासदांना : २०० रु. ● पोस्टेज : २५ रु.

जीवनयात्राः अभिनेता दिग्दर्शक मा.विनायक

लेखक
भाई भगत

मास्टर विनायक यांची अविस्मरणीय चित्रपट कारकीर्द

ब्रह्मचारी, छाया, अमृत, सरकारी पाहुणे, लग्न पहावं करून वगैरे चित्रपटांमुळे गाजलेले अभिनेते-दिग्दर्शक मास्टर विनायक यांनी मराठी रजतसृष्टीत १९३५ ते १९४७ हा काळ गाजवला. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भूमिकांनी आणि दिग्दर्शन कौशल्याने त्यांनी मराठी-हिंदी प्रेक्षकांची हृदये जिंकली. आचार्य अत्रे आणि भाऊसाहेब खांडेकर यांच्यासारख्या प्रतिभावंत लेखकांच्या कथा-पटकथांवर चित्रपट काढून साहित्य आणि सिनेमा यांची अप्रतिम सांगड घातली. इतक्या सन्मानाने आणि आत्मीयतेने चित्रपटक्षेत्रात समकालीन अग्रगण्य लेखकांना सामावून घेणारा, त्यांच्याशी ऋणानुबंध ठेवणारा दुसरा दिग्दर्शक क्वचितच सापडेल. प्रभावी पटकथा तयार करताना मूळ लेखकाच्या कथेची चित्रपटातील दृश्यांच्या दृष्टीने फेरमांडणी करावी लागते. ती करताना दिग्दर्शक आणि मूळ लेखक यांच्यात परस्पर सामंजस्य असेल तर कथानकाची रंगत वाढत जाते; दृश्य स्वरूपात जे दाखवता येते, ते वर्णनापेक्षा खूप व्यापक व अर्थपूर्ण होऊन अधिक प्रभावी ठरते. खांडेकरांसारख्या त्या वेळच्या अग्रगण्य कादंबरीकाराला पटकथा लेखनासाठी मास्टर विनायकांनी गळ घातली; आणि त्या दोघांच्या वेव्ह लेंग्थ्स जुळल्याने मराठी चित्रपटसृष्टीत चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. चिं. वि. जोशी यांच्या कथांचा वापर करूनही त्यांनी खांडेकराकडून उत्कृष्ट पटकथा लिहून घेतल्या. मास्टर विनायक यांना मराठी साहित्य व साहित्यकार यांच्याबद्दल आत्मीयता असल्याने कथानकाला प्राधान्य देणाऱ्या अनेक चित्रपटांची निर्मिती झाली. आचार्य अत्रे यांच्या हातून ब्रह्मचारी, धर्मवीर, प्रेमवीर यासारख्या कलाकृती लिहून झाल्या. वरेरकर, ना. सी. फडके, वि. वि. बोकील वगैरेंच्याही कथांवर त्यांनी चित्रपट काढले. परंतु खांडेकरांच्या इतके त्यांच्याशी मैत्र जुळले नाही. स्वतः खांडेकरांशीही 'ज्वाला'च्या वेळी सतत संपर्क व चर्चा न जमल्याने 'ज्वाला' हा चित्रपट तेवढा दर्जेदार होऊ शकला नाही.

मास्टर विनायक यांचे मराठी चित्रपटसृष्टीला जे योगदान आहे, त्याचे महत्त्व आणि मोल त्यांच्या मृत्यूला पंचावन्न वर्षे झाली तरी ओसरलेले नाही. त्यांची चरित्रे वेगवेगळ्या

लेखकांच्या लेखणीतून सिद्ध होत राहिली. दिनकर द. पाटील, (मास्टर विनायक), एम. डब्ल्यू. केळकर (मास्टर विनायक), मनोहर पुरंदरे (हंसपर्व), माणूस, रसरंग, वेणी यांचे विनयक खास अंक इ.

नुकतेच त्यांच्यावरील भाई भगत यांचे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध झाले आहे.

मास्टर विनायकांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले, मोठमोठ्या दिग्दर्शकांबरोबर काम कलेले भाई भगत अधूनमधून विनायकांवर लेख लिहीत. तेव्हा विश्रब्ध शारदाकार हरिभाऊ मोटे यांनी त्यांना मास्टर विनायकांवर स्वतंत्र पुस्तक लिहिण्याची सूचना केली. ही १९६१ मधील सूचना पुस्तकरूपात उतरायला ४० वर्षे जावी लागली. भाई भगत यांनी चरित्र लिहून पूर्ण केले; परंतु ते प्रकाशित झालेले पाहण्याचा योग त्यांना आला नाही. कारण ४ ऑक्टोबर २००२ रोजी हृदयविकाराचा झटका येऊन ते वारले.

इतक्या सन्मानाने आणि आत्मीयतेने चित्रपटक्षेत्रात समकालीन अग्रगण्य लेखकांना सामावून घेणारा, त्यांच्याशी ऋणानुबंध ठेवणारा दुसरा दिग्दर्शक क्वचितच सापडेल.

विनायकांवरील या पुस्तकाची तयारी मात्र १९६१ पासूनच सुरू होती. भाऊसाहेब खांडेकर, आचार्य अत्रे, बाबूराव पेंढारकर, मीनाक्षी, गजानन जहागीरदार वगैरेंशी त्यांची त्याविषयी चर्चा केली. मास्टर विनायकांच्या पत्नी सुशीलाबाई कर्नाटकी यांच्याही अनेक मुलाखती घेतल्या. त्यामुळे या पुस्तकात आलेले तपशील त्या त्या व्यक्तींबाबतची त्यांची भूमिका प्रकट करणारी आहे. तरीही जेथे मास्टर विनायकांशी कोणी अनुदारपणे वा अनुचितपणे वागले, तेथे त्याकडे लक्ष वेधण्यात त्यांनी हयगय केलेली नाही.

मास्टर विनायक हे मूळ विनायक कर्नाटकी. कोल्हापूरच्या विद्यापीठ हायस्कूलमध्ये ते शिक्षक होते. शाहू महाराजांच्या आश्रयाखाली चाललेली, १९१७ मध्ये तोफखाने - दीक्षित यांनी सुरू केलेली ही शाळा ब्राह्मणांपेक्षाही ब्राह्मणेतर मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी अनेक उपक्रम राबवत होती. बाहेरगावच्या मुलांसाठी तपोवन हे वसतिगृह होते. कर्नाटकी सर तपोवनात राहत. बलोपासना व सांस्कृतिक शिकवणीचा भार कर्नाटकी व गजानन जहागीरदार यांच्यावर असे. देश स्वतंत्र होईपर्यंत आपण ब्रह्मचारी राहायचे अशी प्रतिज्ञा महात्मा गांधीजींच्या उपस्थितीत कर्नाटकींनी घेतली होती. कर्नाटकी व जागीरदार हे दोघे नाटके बसवत. मुलांना अभिनयाचे धडे देत बर्नार्ड शॉ चे सेंट जोन, शेक्सपिअरचे मर्चंट ऑफ व्हेनिस वगैरे नाटके शाळेत केली. त्यातील विनायक व जागीरदार यांच्या अप्रतिम अभिनयाची वाहवा झाली. एकदा मेहेरबाबांच्या आश्रमात ते दोघे गेले असताना, ''तुम्ही दोघेजण फार मोठे, आभाळाएवढे मोठे होणार असं बाबांना म्हणायचंय '' असं त्यांना सांगण्यात आले. नाटकातील त्यांचे काम पाहून प्रभात कंपनीचे संचालक व्ही शांताराम यांनी त्यांना भेटीला बोलावले. शांतारामबापू हे विनायकांचे मावसभाऊ. तसेच बाबूराव पेंढारकर व भालजी हेही मोठे भाऊ. शांतारामबापूंनी विनायकाला प्रभात कंपनीत येण्याचे आमंत्रण दिले. शाळेचा राजीनामा देऊन विनायक शाहुपुरीतील स्टुडिओत

विनायकांच्या संवेदनशील स्वभावाची छाप खांडेकरांवर पडली. आपला स्वभावधर्माचा दिग्दर्शक आपल्याला मिळाला याची धन्यता त्यांना वाटली.

दाखल झाले. व्ही शांताराम यांनी त्यांचे मास्टर विनायक असे नामकरण करून आपला असिस्टंट म्हणून त्यांची नेमणूक केली. आद्य मराठी 'अयोध्येचा राजा' या चित्रपटाचे शूटिंग चालू होते. त्यात नारदाची भूमिका विनायकांकडे आली. गाण्याच्या तालमी गोविंदराव टेंबे घेत. ६ मार्च १९३२ रोजी हा बोलपट मुंबईत प्रदर्शित झाला. त्याने प्रेक्षकांची मने जिंकली.

'जलती निशानी' या दुसऱ्या चित्रपटात विनायकांना हीरोचा रोल दिला गेला. त्यासाठी उर्दूचे धडे त्यांनी घेतले. त्यानंतर माया मच्छिंद्रमध्ये गोरखनाथाचे काम विनायकांनी केले. तेही उत्तम झाले. 'आकळेना अघटित घटना तव दयाघना' हे विनायकांनी म्हटलेले गाणे भलतेच हिट झाले.

'सिंहगड' मधील जगतसिंह, 'सैरंध्री'मधील कंचुकी या भूमिकाही विनायकांच्या वाट्याला आल्या. प्रभातचा पहिला रंगीत बोलपट सैरंध्री. पण दुर्दैवाने तांत्रिक बाबी बिघडल्याने तो आपटला. 'प्रभात'चा प्रपंच कोल्हापूरहून पुण्याला हलला. बाबूराव पेंढारकर आणि मास्टर विनायक हे मात्र कोल्हापूरातच राहिले.

१९३३ मध्ये राजाराम महाराजांची कोल्हापूर सिनेटोन हा स्टुडिओ सुरू केला. कृष्णाच्या जीवनावरील 'आकाशवाणी' चित्रपटातील वासुदेवाची भूमिका विनायकांनी केली. लेखन - दिग्दर्शन भालजी पेंढारकरांनी केले. आकाशवाणीने उत्तम धंदा केला. 'कालियामर्दन' हा पुढचा चित्रपट. पण भालजीनी काही कारणाने संस्था सोडली. मास्टर विनायक यांना सहदिग्दर्शक व्हावे लागले. पुढच्या चित्रपटाचे दिग्दर्शन विनायकरावांनी करावे असे ठरले. तेव्हा त्यांनी कल्पना सुचवली, ''आता काळ बदललाय. आपण एखादे सामाजिक चित्र काढावं.'' मामा वरेरकरांच्या कथेवरील 'विलासी ईश्वर' हा चित्रपट काढण्याचे ठरले. नवोदित अभिनेत्री शोभना समर्थ यांना नायिका केले. गायिका इंदिरा वाडकर यांनाही प्रथमच पडद्यावर चमकवले. ''अनौरस संतती ही खरी प्रेमसंतान असल्याने ती नेहमी कर्तबगार ठरते हे कथासूत्र.'' हा चित्रपट आर्थिक दृष्ट्या यशस्वी झाला नाही. पण यातून अनेक सामाजिक यशस्वी चित्रांचा युगप्रवर्तक दिग्दर्शक जन्माला आला. (६१)

काही मतभेदामुळे विनायक व बाबूराव यांनी कोल्हापूर सिनेटोन सोडायचे ठरवले. पुढे काय? हा प्रश्न होता. बाबूरावांनी मुंबईत जाऊन एक फायनान्सर गाठला आणि छायाचित्रकार पांडुरंग नाईक, बाबुराव व विनायक या तिघांच्या भागीदारीत हंस पिक्चर्स ही कंपनी सुरू केली. पहिला चित्रपट आचार्य अत्रे यांच्या कथेवर काढायचे ठरले. पण त्यांना वेळ नव्हता. तेव्हा खांडेकरांना गळ घालण्यात आली. 'छाया'ही कथा 'हृदयशून्य अशा या जगात एका गरीब कुटुंबातील बहीण भावांच्या आयुष्याची झालेली वाताहत' चित्रीत करणारी होती. विनायकांच्या संवेदनशील स्वभावाची छाप खांडेकरांवर पडली. आपला स्वभावधर्माचा दिग्दर्शक आपल्याला मिळाला याची धन्यता त्यांना वाटली. (७७) दोन गाणी बा. भ. बोरकरांची घेण्यात आली. वसंत देसाई यांजकडे संगीत दिग्दर्शन

देण्यात आले. शूटिंग पुण्यात सुरू झाले. खांडेकरांमुळे पुण्यातले सगळे बडे साहित्यिक मुहूर्ताला आले. 'छाया'ने हंसचा पाया मजबूत केला. विनायक हे प्रथम दर्जाचे दिग्दर्शक म्हणून मान्यता पावले तरुण प्रेक्षकांची हृदये त्यांनी काबीज केली.

परंतु या चित्रपटाच्या व विनायकरावांच्या यशामुळे बाबूराव पेंढारकरांच्या मनात मत्सर पेटला. त्यांच्यात सूक्ष्म कलहाची बीजे पडली.

एक नटी इंदिरा वाडकर यांची बहीण सुशीला हिच्या प्रेमात विनायकराव पडले. ब्रह्मचारी राहण्याची त्यांची प्रतिज्ञा...त्यांचा खूपच कोंडमारा झाला.

या चित्रपटाच्या व विनायकरावांच्या यशामुळे बाबूराव पेंढारकरांच्या मनात मत्सर पेटला. त्यांच्यात सूक्ष्म कलहाची बीजे पडली.

त्यानंतर धर्मवीर हा चित्रपट आला. बाबूराव पेंढारकरांना महत्त्वाची भूमिका हवी म्हणून आचार्य अत्रे यांनी इब्सेनच्या 'पिलर ऑफ दि सोसायटी' या नाटकावर आधारित धर्मवीर ही कथा लिहिली. त्यातील जगदीशच्या विनोदी भूमिकेत विनायकांनी रंग भरले. विनोदी नट म्हणून त्यांचा लौकिक वाढला. चार्ली चॅपलिनच्या वळणावरची विडंबनात्मक अशी ती भूमिका होती. दिग्दर्शन व अभिनय या दोन्ही दृष्टींनी विनायकरावांचा दबदबा वाढला.

बाबूराव पेंढारकरांच्या मत्सरात भरच पडली. पुढचा चित्रपट फक्त हिंदीत काढून विनायकरावांना सक्तीची विश्रांती देण्यात आली. त्यावेळी सुशीलेशी त्यांनी लग्न केले. आचार्य अत्रे यांच्या बेगुनाह कथेवरचा चित्रपट पार कोसळला. बाबुरावांना आपली चूक कळली. खेळकर भूमिकेत विनायकरावच प्रेक्षकांना हवे हवेत, तशी कथा द्या म्हणून अत्रे यांना सांगण्यात आले. तरुणांची करमणूक करील असा, नायकाच्या उपद्व्यापातून व खुशखुशीत संवादांतून प्रेमवीर कॉलेजकुमार अत्रे यांनी उभा केला. सर्वार्थाने तरुणांचा व तरुणांनीच निर्माण केलेला हा चित्रपटही तरुणवर्गात आवडला. छाया, धर्मवीर व प्रेमवीर अशी हॅटट्रिक झाल्याने विनायकराव कुशल नट व दिग्दर्शक म्हणून प्रस्थापित झाले.

चंद्रमोहन या हिंदी नटाला पुढे ठेवून मॅकबेथवर बेतलेली 'ज्वाला'ची पटकथा खांडेकरांनी तयार केली. चंद्रमोहनला मराठी बोलणे जमत नव्हते तरी बाबूरावांनी मराठी चित्रपट काढण्याचा आग्रह धरला. तो अंगलट आला. 'ज्वाला'ची पार राख झाली. चित्रपट कोसळला. हंसला फटका बसला. हिंदी ज्वालाही अपेशी ठरला. मात्र त्यापुढच्या ब्रह्मचारीने हंसला पुन्हा तारले. मीनाक्षी या नवीन नटीच्या 'यमुनाजळी'ने त्यावेळच्या तरुण वर्गाला पागल केले. विनायकरावांची ब्रह्मचाऱ्याची भूमिका अफलातून झाली. स्विमिंग सूट घालून काम करणारी मीनाक्षी ही पहिलीच मराठी नायिका.

मात्र ब्रह्मचारी रॉयल फिल्म सर्किटला एक लाख दहा हजाराला विकावा लागला. त्यामुळे हंसचे तीन लाखांचे तरी नुकसान झाले. ब्रह्मचारीने यश दिले, पण पैसा दिला नाही. 'ब्रँडीची बाटली'मधील बगारामच्या भूमिकेत दामुअण्णा मालवणकर पुन्हा गाजले. 'देवता' हा गंभीर चित्रपट खांडेकरांनी लिहिला. बाबुराव पेंढारकरांनी त्यात खलनायकाऐवजी

छाया, धर्मवीर व प्रेमवीर अशी हॅटट्रिक झाल्याने विनायकराव कुशल नट व दिग्दर्शक म्हणून प्रस्थापित झाले.

नायकाची भूमिका करण्याचा हट्ट धरला. विनायकरावांना त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. पण देवताच्या यशाने सर्वांनाच आनंद दिला. 'सुखाचा शोध' या पुढच्या चित्रपटाचे दिग्दर्शन पार्श्वनाथ आळमेकरांनी केले. विनायकरावांनी या 'रजेच्या' काळात आपल्या शाहूपुरीतील बंगल्याचे काम तडीला नेले. त्याच वेळी आचार्य अत्रे यांनी नवयुग चित्रपट कंपनी काढून, हंस चे तिच्यात विलीनीकरण घडवून आणले. बाबुराव पेंढारकरांना अत्र्यांनी पुरतं गुंडाळलं. राजगुरू प्रेसचे राजगुरू, कॉमनवेल्थचे अभ्यंकर आणि अत्रे यांनी हंसची मालमत्ताही साठ हजारांना विकत घेतली. हंसचे अस्तित्व संपुष्टात आले.

'नवयुग'तर्फे चिं. वि. जोशी यांच्या कथांवर आधारित 'लग्न पाहावं करून' हा चित्रपट निघाला. तो यशस्वी ठरला. चित्रपटात कॅमेरा कसा बोलू शकतो ते विनायकरावांनी अफाट चातुर्याने दाखवले.

त्यावेळी विनायकरावांची आई वारली. त्यांना खूप धक्का बसला. छोटी मुलगी नंदिनी हिला विनायकांच्या मांडीवर बसवून खांडेकर म्हणाले, ''आजपासून हिलाच तुम्ही आई म्हणा.''

विनायकराव म्हणाले, ''ही माझी छोटी आई.''

खांडेकरांची 'अमृत'ची पटकथा लिहिली. गरीब-श्रीमंत ही दोन जगे, गरीबांना विष आणि श्रीमंतांना अमृत अशी दु:ख सुखाची वाटणी झाली. पण जग एकच असते. माणसांचं माणुसकी हेच या जगातलं अमृत असा संदेश देणारी ही कथा. कोकणच्या निसर्गाचे अप्रतिम बाह्यचित्रण. नवयुगच्या या चित्रानेही उत्तम यश मिळवले.

पण या यशाने बाबुराव पेंढारकरांचा मत्सर पुन्हा उफाळून आला. त्यांनी नवयुग सोडले. पांडुरंग नाईकांनीही सोडले. आचार्य अत्रेही बाहेर पडले. विनायकरावांनी सरकारी पाहुणे हा चित्रपट तयार केला. नंतर वि. वि. बोकील यांच्या कथेवर पहिली मंगळागौर हा चित्रपट काढला. त्यात लता मंगेशकर या परकरी पोरीला छोटीशी भूमिका दिली. तिचे गाणे ऐकून विनायकराव म्हणाले, ''दीनानाथांची गायकी म्हणजे विद्युल्लतेचा चमचमाट! क्षणभर चमकून जाईल पण तानांची सुरावट कुणाला कळणार नाही. ऐकणारा अक्षरश: दिपून जात असे.'' पहिली मंगळागौरमध्ये दामुअण्णांनी अश्लील मार्तंडाची भूमिका केली. श्री. म. माटे यांच्यासारखी वेशभूषा करून बहार आणली.

पण या चित्रपटानंतर विनायक व नवयुग यांचेही संबंध बिघडले. विनायकराव बाहेर पडले. त्यांच्याबरोबर लता, मीनाक्षी, दामुअण्णा, साळवी, जोग, दिनकर पाटील हेही बाहेर पडले.

विनायकरावांनी स्वत:ची प्रफुल्ल चित्र ही कंपनी काढली. 'माझं बाळ'ची निर्मिती कोल्हापूरला सुरू केली. कुमारी मातेचा प्रश्न हाताळणारी खांडेकरांची कथा. चित्रपट चांगला चालला. त्यानंतर वि. वि. बोकील यांची चिमुकला संसार ही कथा घेतली. वसंत

जोगळेकर यांना दिग्दर्शक केले. पण तो चित्रपट जेमतेमच चालला. दुसऱ्या महायुद्धामुळे फिल्मवर नियंत्रण आले. कच्ची फिल्म मिळताच बडी माँ हा मुद्दा प्रचारपट काढण्याचे ठरले. नूरजहान, लीला मिश्रा, सितारा, याकूब व मीनाक्षी, लता, जोग, साळवी वगैरे कलावंत. नूरजहानला न जमलेली तान लताने सहजपणे घेऊन दाखवली तेव्हा संगीत दिग्दर्शक के. दत्ता म्हणाले, ''विनायकराव, हे झाकलं माणिक आहे. हिच्यासारखा हाय पीच अजूनपर्यंत मी ऐकला नव्हता...ही पोरगी एक दिवस साऱ्या जगात प्रसिद्ध होईल.''

नूरजहानला न जमलेली तान लताने सहजपणे घेऊन दाखवली तेव्हा संगीत दिग्दर्शक के. दत्ता म्हणाले, ''विनायकराव, हे झाकलं माणिक आहे. हिच्यासारखा हाय पीच अजून पर्यंत मी ऐकला नव्हता''

त्याचवेळी विनायकरावांनी शिवाजी पार्कला आशीर्वाद बंगला बांधून, मुंबईत स्थलांतर केले. सुभद्रा हा खांडेकरलिखित पौराणिक चित्रपट काढला. तो चांगला चालला. परंतु हिंदू-मुसलमान दंगे भडकले आणि चित्रपट प्रदर्शन अर्थातच थांबले.

नंतर काही चित्रपट त्यांनी काढले. पण तब्येत ढासळली. १७ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांचे मुंबईत निधन झाले.

मराठीत सामाजिक चित्रपट काढणे, खांडेकर-बोकील-अत्रे-वरेरकर वगैरे साहित्यिकांचा पटकथेसाठी आग्रह धरणे, अनेक दिग्दर्शकांना संधी देणे, अनेक नव्या कलावंतांना संधी देणे, हे विनायकरावांचे योगदान बेबी नंदा ही त्यांची कन्या. तिनेही आपल्या परीने चित्रपटसृष्टी गाजवली.

मास्टर विनायकांच्या योगदानाचे रेखीव दर्शन भाई भगत यांनी घडवले आहे. बाबुराव पेंढारकर हे विनायकरावांचे मावसभाऊ. पण विनायकरावांचे अभिनेता व दिग्दर्शक म्हणून महत्त्व वाढताना बघून त्यांच्यातील मत्सर जागा होई. त्यातून चांगल्या चाललेल्या हंस व नवयुग या कंपन्या गोत्यात आल्या. विनायकरावांचीही ससेहोलपट झाली. तरीही त्यांनी अनेक अविस्मरणीय चित्रपट दिले. त्यामुळे त्यांचे स्मरण नित्य होत राहील.

पृष्ठे : २१२ ● किंमत : १५० रु. ● सभासदांना : १२० रु. ● पोस्टेज : २० रु.

प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या सिनेस्टार्सची गुपितं, मतं, विचारशैली आणि एकूणच व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणाऱ्या मनमोकळ्या मुलाखती

टेक् २५ भावना सोमय्या
अनुवाद : अंजनी नरवणे

किंमत : ४००रु.

*** महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार - २००३**

१) **पं.रामाचार्य अवधानी,** (तत्त्वज्ञानविषयक लेखन) (रु.१,५००/-)
डॉ. शं. रा. तळघट्टी, पुणे

२) **कविवर्य भा. रा. तांबे,** (काव्यपुरस्कार) (रु.१,१००/-)
प्रा. पुरुषोत्तम पाटील, धुळे

३) **कविवर्य ना. घ. देशपांडे,** (काव्यपुरस्कार) (रु.१,१००/-)
श्री. जगदीश खेबुडकर, कोल्हापूर

४) **डॉ. भालचंद्र फडके,** (दलित साहित्य-विवेचन) (रु.१,०००/-)
श्री. शरणकुमार लिंबाळे, नाशिक

५) **प्रा. गो. रा. परांजपे,** (विज्ञानविषयक लेखन) (रु.१,०००/-)
श्री. सुबोध जावडेकर, मुंबई

६) **कै. कमलाकर सारंग,** (नाट्यसंहिता/नाटककार) (रु.३,०००/-)
श्री. सुरेश खरे, मुंबई

७) **'मृत्युंजय'** (रु.८,०००/-)
(व्रतस्थ संशोधनकार्य)
डॉ. म. अ. मेहेंदळे, पुणे

८) **कै. श्रीपाद जोशी** (संदर्भ-ग्रंथ/अनुवाद इ.) (रु.५,०००/-)
डॉ. शां. ग. महाजन, पुणे

ग्रंथ पारितोषिके

१) **ह. ना. आपटे पारितोषिक** (कादंबरी) (रु.१,०००/-)
मकरंद साठे, 'अच्युत आठवले आणि आठवण'

२) **आनंदीबाई शिर्के** (कथासंग्रह) (रु.१,०००/-)
श्री. स्टीफन परेरा, 'वारमोड'

३) **नी. स. गोखले** (उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती) (रु.१,०००/-)
मिलिंद ल. परांजपे, 'माधव सातवळेकर'

४) **रा. ना. नातू** (इतिहासविषयक) (रु.१,०००/-)
श्री. रवीन्द्र गोडबोले, 'औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका'

५) **डॉ. म. वि. गोखले** (नाट्यसमीक्षा) (रु.१,०००/-)
श्री. राजीव नाईक, 'खेळ नाटकाचा-एक पडदा आणि तीन घंटा'

६) **सत्यशोधक केशवराव विचारे** (ललितेतर वैचारिक) (रु.१,०००/-)
श्री. शरद पाटील, 'जात्यंतक भांडवलदारी'.
क्रांती व तिची समाजवादी पूर्ती'

७) **गणेश सरस्वती ठाकूरदेसाई** (ललितेतर वैचारिक) (रु.५००/-)
इंदुमती पारीख, 'समाज विकासासाठी व्यक्तिविकास'

८) **शि. म. परांजपे** (ललितेतर वैचारिक) (रु.१,०००/-)
माधव गोडबोले, 'नवी आव्हाने, कालबाह्य मानसिकता'

९) **अभिजात पारितोषिक** (समाजशास्त्रांतर्गत लेखन) (रु.५,०००/-)
डॉ. ग. ना. जोशी, 'योगशास्त्र:आधुनिक विवरण'

१०) **पुष्पलता रानडे** पुरस्कृत **लक्ष्मीबाई टिळक** (आत्मचरित्र)(रु.२,०००/-)
उर्मिला पवार, 'आयदान'

११) **प्रा. रा. श्री. जोग** (समीक्षा) (रु.३,५००/-)
डॉ. अरविंद वामन कुळकर्णी, 'उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी'

*** अवचट यांना फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार**

सातारा येथील फुले-आंबेडकर साहित्य पंचायतीतर्फे दिला जाणारा 'फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार' या वर्षी डॉ. अनिल अवचट यांना देण्यात आला. नाशिकचे अरुण काळे यांना 'यशवंतराव काव्यगौरव पुरस्कार', तर सोलापूरचे भीमराव जाधव गुरुजी यांना 'जीवन गौरव पुरस्कार' देण्यात आला.

नऊ मे रोजी जकातवाडी (ता.सातारा) येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण झाले. या पंचायतीतर्फे गेल्या १२ वर्षांपासून फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार दिला जातो. दहा हजार रुपये, शाल, श्रीफल व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. परिवर्तनवादी चळवळीत मदत करणाऱ्या व फुले-आंबेडकर यांचे विचार पुढे घेऊन जाणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकास हा पुरस्कार दिला जातो.

यशवंतराव चव्हाण काव्यपुरस्कार अरुण काळे यांच्या 'रॉक गार्डन' या काव्यसंग्रहाला देण्यात आला. पाच हजार रुपये, शाल, श्रीफल, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. भटक्या विमुक्त जमाती संघटनेतर्फे दिला जाणारा जीवन गौरव पुरस्कार या वर्षी सुरेश गायकवाड गुरुजी (सोलापूर) यांना देण्यात आला. भटक्या विमुक्तांसाठी आयुष्यभर काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला हा पुरस्कार दिला जातो. तो दहा हजार रुपयांचा आहे. यापूर्वी हा पुरस्कार सोलापूरचे माजी महापौर भीमराव जाधव गुरुजी, यल्लप्पा वैदू (पनवेल) यांना देण्यात आला.

*** विजया पाटील यांना नरुभाऊ लिमये स्मृती पुरस्कार**

''महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय संस्थेतर्फे 'सकाळ'च्या सरव्यवस्थापिका विजया पाटील

यांना यंदाचा नरुभाऊ लिमये स्मृती-आर्यभूषण पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुरस्काराचे हे सातवे वर्ष आहे. दहा हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. वृत्तपत्र क्षेत्रात 'सकाळ'च्या माध्यमातून सौ. पाटील यांनी केलेली उल्लेखनीय कामगिरी लक्षात घेऊन त्यांची निवड केली गेली.

* अरुण कोलटकर यांना कोठावळे पुरस्कार

केशवराव कोठावळे पारितोषिक ट्रस्टतर्फे सर्वोत्कृष्ट ग्रंथासाठी दिला जाणारा २००४चा हा पुरस्कार कोलटकर यांच्या 'भिजकी वही' या कवितासंग्रहासाठी त्यांना श्री. चित्रे यांच्या हस्ते देण्यात आला. १५ हजार १५१ रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे विसावे वर्ष आहे. दुसऱ्यांदा हा पुरस्कार कवितासंग्रहाला दिला गेला आहे. या कवितासंग्रहाचे प्रकाशक असलेल्या प्रास प्रकाशनचे अशोक शहाणे यांचाही या वेळी स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

* नाट्य परिषदेचे पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा राम गणेश गडकरी पुरस्कार यंदा नाटककार अशोक पाटोळे यांना जाहीर झाला आहे; तसेच ज्येष्ठ अभिनेत्री आशालता वाबगावकर यांना बालगंधर्व पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रदीप काबरे यांनी परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा केली. त्यात केशवराव भोसले पुरस्कार प्रसिद्ध गायक अजित कडकडे यांना आणि चिंतामणराव कोल्हटकर पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांना जाहीर करण्यात आला.

ज्येष्ठ नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या स्मृतिदिनी म्हणजेच १४ जूनला पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

नाट्य परिषदेच्या अन्य पुरस्कार विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे :

कोल्हापूर गौरव पारितोषिक : श्रीकांत मोघे,
बालगंधर्व पारितोषिक : डॉ. क्षमा वैद्य,
नाटककार गो. ब. देवल पारितोषिक : प्रशांत दळवी,
नटसम्राट गणपतराव जोशी पारितोषिक : अविनाश नारकर,
वि. स. खांडेकर नाट्यसमीक्षा पारितोषिक : जयंत पवार,
दिनकर कामण्णा रसिक गौरव पारितोषिक : संजय नार्वेकर,
नाटककार मा. आ. कामत स्मृती पारितोषिक : सु. श्री. इनामदार,
ज्योत्स्ना भोळे पारितोषिक : स्वाधीन डे,
आचार्य अत्रे पारितोषिक : चं. प्र. देशपांडे,
सतीश दुभाषी पारितोषिक : परेश मोकाशी,
विजया चांदोरकर पुरस्कृत सतीश दुभाषी पारितोषिक : अमोल बावडेकर '(शतजन्म शोधताना'),
अ बा पंडित स्मृती मराठी रंगभूमी पारितोषिक : सुयोग '(आम्ही दोघं राजाराणी'),
मामा वरेरकर पारितोषिक : राजश्री देव (नांदेड),
गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे पारितोषिक : पं. हृदयनाथ मंगेशकर '(शतजन्म शोधिताना'),

शांता आपटे पारितोषिक : मीना देशपांडे,
मा. दत्ताराम पारितोषिक : सुप्रिया पिळगावकर,
ला. कृ. आयरे पारितोषिक : सदाशिव चव्हाण,
ना. सी. फडके पारितोषिक : तारा पाटकर,
भार्गवराव पांगे पारितोषिक : नारायण जाधव
भातखंडे पारितोषिक : चारुदत्त आफळे,
दीनानाथ मंगेशकर पारितोषिक : देवल स्मारक मंदिर,
रघुवीर सावकार गौरव पारितोषिक : रोहिणी हट्टंगडी,
बाबा वर्दम गौरव पारितोषिक : दत्ता परब.
काकासाहेब खाडिलकर गौरव पारितोषिक : नाट्य परिषद, नांदेड शाखा,
शंकर घाणेकर गौरव पदक : सिद्धार्थ जाधव,
अ. सी. केळुस्कर पारितोषिक : जयश्री गरुड (स्वप्नशाळा),
बाळकृष्ण भोसले पारितोषिक : श्री. गाडेकर (भरत नाट्य मंदिर),
प्रभाकर भालेकर पारितोषिक : बाळ धुरी,
पंडित राम मराठे पारितोषिक : शिवानंद पाटील,
वसंत देसाई पारितोषिक : राजीव परांजपे (पुणे),
गोपीनाथ सावकार आदरणीय दिग्दर्शक पुरस्कार : प्रकाश बुद्धिसागर,
मास्टर नरेश पुरस्कार : अतुल परचुरे, सुधा आपटे.
कुसुम कुलकर्णी गौरव पारितोषिक : अरुणा भट (पुणे),
माणिक वर्मा पारितोषिक : बाळ नाईक,
प्र. म. ऊर्फ बापूसाहेब टिळक स्मृती पुरस्कार : वसंत जाधव,
कमलाकर सारंग पारितोषिक : किरण पोत्रेकर,
अन्नपूर्णा पारितोषिक : श्री. वाडेकर (सांगली),
कमलाकर नारायण गोगटे पारितोषिक : चेतन दातार (फ्रेंड्स),
दादू इंदुरीकर पुरस्कार : वसंत अवसरीकर,
गणेश दादू इंदुरीकर पुरस्कार : जयमाला इनामदार (पुणे).

* सेवारूप करुणामूर्ती पुरस्कार

''समरसतेच्या भावनेतूनच स्त्रीची प्रत्येक कृती होत असते. ती तिचे जीवन कुटुंबाच्या कल्याणासाठी घालवते.'' असे प्रा. श्यामा घोणसे यांनी सांगितले.

सामाजिक समरसता मंच आणि नामदेवराव घाडगे स्मृती समिती यांच्यातर्फे सेवारूप करुणामूर्ती भगवान गौतम बुद्ध पुरस्कार प्रदान करण्यात आले. लेखिका सुवर्णा नाईक-निंबाळकर अध्यक्षस्थानी होत्या. ॲडव्होकेट केतकी देशपांडे, उषा झेंडे, प्रीती जोशी, शीला चौधरी, रेखा कांड, मंगला साबळे, शैलजा जोशी, सुरेखा यादव, सरलाबेन शहा, जयश्री लांडगे, मीरा माने, रतन शिंदे, कल्पना बामणे, अश्विनी नगरकर, नंदा माने आणि डॉ. विलास जोग यांना हा पुरस्कार देण्यात आला.

* सुरेश खोपडे यांना समाजभूषण पुरस्कार

शिवाजी लोकविद्यापीठातर्फे सुरेश खोपडे यांना नुकताच समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रमेश ठाकोर हे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. खोपडे यांनी पोलिस खात्यात बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

* कुमार केतकर यांना जांभेकर पुरस्कार

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीतर्फे देण्यात येणारे राज्यस्तरीय दर्पण पुरस्कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पोंभुर्ले (जि. सिंधुदुर्ग) येथे जाहीर करण्यात आले.

या वर्षीचा जांभेकर ज्येष्ठ संपादक पुरस्कार दै. 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांना जाहीर झाला. नागपूर विभागात 'सकाळ'चे वर्धा जिल्हा प्रतिनिधी प्रकाश कथले यांना दर्पण पुरस्कार जाहीर झाला आहे.

पोंभुर्ले (ता. देवगड) या बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मगावी कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सतीश सावंत आणि जिल्हा माहिती अधिकारी अंबादास म्याकल यांच्या उपस्थितीत आचार्य जांभेकरांच्या १५८ व्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या स्मारकाजवळ कार्यक्रम घेण्यात आला.

विभागवार दर्पण पुरस्कार पुढीलप्रमाणे

पुणे विभाग : सुधीर गाडगीळ (स्तंभलेखक व ज्येष्ठ निवेदक, पुणे)

कोकण विभाग : शिवराम सखाराम देसाई (संपादक, साप्ताहिक देवदुर्ग, देवगड)

नाशिक विभाग : चंद्रवदन ठाकोरलाल मिठावाला (ज्येष्ठ पत्रकार; नवापूर, जि. नंदुरबार)

नागपूर विभाग : प्रकाश नत्थुजी कथले (वर्धा जिल्हा प्रतिनिधी, सकाळ, तळेगाव, ता. आष्टी)

औरंगाबाद विभाग : सुनील मधुकरराव ठेपे (जिल्हा प्रतिनिधी केसरी, उस्मानाबाद)

अमरावती विभाग : प्रा. नवलकिशोर माणकलाल जोशी (प्रतिनिधी लोकसत्ता, यवतमाळ)

दर्पण पुरस्काराचे हे बारावे वर्ष असून, रोख दोन हजार ५०० रुपये, गौरवचिन्ह, आचार्य जांभेकर यांचा चरित्र ग्रंथ व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

* ''गुंता सोडविताना'' ग्रंथास पारितोषिक

स्वातंत्र्यसेनानी आदरणीय तांबटकाका यांचे नावे विविध साहित्यप्रकारांना पुरस्कार दरवर्षी जाहिर होतात. मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या प्रा. अनुराधा गुरव यांच्या ''गुंता सोडविताना'' या वैचारिक लेख संग्रहाला या वर्षी हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र पातळीवरील स्पर्धेमध्ये मिळाल्याचे प्रा. डॉ. दिनकर पाटील यानी प्रसिद्ध केले आहे. प्रा. अनुराधा गुरव यांचे अभिनंदन!

फुले आणि काटे

* अपरिहार्य मराठी

महाराष्ट्रात राहणाऱ्या; परंतु मराठी शिकण्यास नाखूष असलेल्या हट्टी मंडळींना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने चांगला धडा शिकविला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न शिक्षण संस्थांमध्ये मराठी भाषा सक्तीची असावी, असा निर्णय राज्य शासनाने घेतला होता; परंतु त्या निर्णयाविरोधात न्यायालयात धाव घेणाऱ्या मंडळींनी भाषिक अल्पसंख्याकांच्या विशेषाधिकाराचा मुद्दा उपस्थित केला. राज्यातील भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्याकांना घटनेने अधिकार दिलेले आहेत. मराठी भाषा सक्तीची झाल्याने या अधिकारावर गदा येईल, असे न्यायालयाचा दरवाजा ठोठावणाऱ्या मंडळींना वाटत होते; परंतु राज्य सरकारने या संदर्भात केलेला युक्तिवाद सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला. 'मराठी नको' असणाऱ्या शाळांमधून इंग्रजीसारख्या परकीय भाषेचे शिक्षण दिले जाते. इंग्रजीच्या शिक्षणाने त्या मुलांच्या किंवा पालकांच्या अधिकारावर गदा येत नाही, तर मग मराठीसारखी स्वदेशी भाषा शिकल्याने ती कशी येऊ शकते?' असा प्रश्न उपस्थित करून राज्य सरकारच्या वतीने मराठी शिकण्याचे किती फायदे आहेत, याचे चांगल्या पद्धतीने समर्थन करण्यात आले. ते लक्षात घेऊनच सर्वोच्च न्यायालयाने मराठी सक्तीला अनुमती दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आता येत्या शैक्षणिक वर्षापासून सर्वच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये मराठी शिकणे सक्तीचे होईल. अन्य भाषकांसोबत या निर्णयाचा मराठीपासून दूर चाललेल्या महाराष्ट्रातील नव्या पिढीलाही फायदा होईल.

मराठी भाषासंवर्धन आणि त्यासाठी मराठी माणसांचे योगदान, हा विषय नेहमीच वादग्रस्त राहिला आहे. विशेषत: संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनापासून मराठीच्या अस्मितेचा मुद्दा वारंवार पुढे येत गेला; परंतु योग्य नेतृत्व आणि कडवेपणा यांच्या अभावामुळे मराठीच्या विकासासाठी जी धोरणे राबवायला हवी होती, ती राबविण्यासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत. डांग, उंबरगाव, बेळगावसारख्या गुजरात,कर्नाटक,काही प्रमाणात आंध्र आणि मध्य प्रदेशाच्या हद्दीत असलेल्या मराठी माणसांकडे १९६० पासून आम्ही पाठ फिरवली, त्यामुळे तेथील मराठी भाषकांना गुजराती वा कन्नड सक्तीला सामोरे जाण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. मात्र, महाराष्ट्रात विशेषत: मुंबई आणि मोठ्या शहरांमध्ये राहणाऱ्या अन्य भाषकांना मराठी भाषा शिकणे कधीच गरजेचे वाटले नाही. आपण भाषक अल्पसंख्यांक आहोत, असे सांगत या मंडळींनी महाराष्ट्र सरकारकडून शिक्षण संस्था काढण्यासाठी भूखंड मिळविले. भरपूर सवलती लाटल्या; परंतु जेव्हा जेव्हा मराठी भाषा सक्तीचा विषय येत असे, तेव्हा अन्य भाषकांची लॉबी आपल्या आर्थिक आणि राजकीय सामर्थ्याचा वापर

करून त्या निर्णयात अडथळे आणीत असे. मराठी नेतृत्वसुद्धा मराठीच्या सक्तीबाबत आग्रही नसल्याने हा विषय लावून धरला जात नव्हता; परंतु गेल्या दशकात सुधीर जोशी, रामकृष्ण मोरे यांच्यासारख्या शालेय शिक्षणमंत्र्यांनी हा मुद्दा चांगल्या पद्धतीने पुढे आणला. सर्व स्तरांतून येणाऱ्या दबावाला न जुमानणाऱ्या राज्य सरकारने न्यायालयीन लढाईतही बाजी मारली. महाराष्ट्राच्या उदार धोरणामुळेच संपूर्ण आयुष्य महाराष्ट्रात काढूनही मराठी भाषा न येणाऱ्या नामवंतांची यादी खूप मोठी आहे. महाराष्ट्रात राहून सर्व काही मिळविणाऱ्या अन्य भाषक मंडळींना मराठी भाषा शिकणे कमीपणाचे वाटते, असा सार्वत्रिक अनुभव आहे. आणि काही मतलबी लोक या भाषक वादाला नेहमीच खतपाणी घालत असतात. वयोवृद्ध गांधीवादी नेत्या डॉ. उषा मेहता यांनी मात्र अन्य संस्थांसोबत उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यामुळे हा विषय चिघळला. वास्तविक महात्मा गांधी यांना अभिप्रेत असलेल्या 'भाषिक लोकशाही'च्या वाढीसाठी योग्य असा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला होता हे 'गांधी विचारदर्शन : भाषा,संस्कृती व कला' या ग्रंथातील पुढील परिच्छेदावरून लक्षात येते. महात्माजी म्हणतात,''भारतात बहुजन समाजाचे स्वराज्य व्हावयाचे असेल, तर त्याला समजणाऱ्या भाषेतूनच शिक्षण, राज्यकारभार, न्यायदान आणि नवज्ञाननिर्मिती झाली पाहिजे. प्रवेश राज्याच्या सर्व कारभारात त्या त्या प्रादेशिक भाषेला, म्हणजेच तेथील बहुसंख्याकांच्या मातृभाषेला स्थान असले पहिजे.'' महात्माजींच्या या मताचा विसर पडलेल्या मंडळींचे आता न्यायालयाच्या निर्णयाने तरी डोळे उघडतील, अशी आशा करण्यास हरकत नाही.

पण महाराष्ट्रात मराठी भाषा आली नाही तरीही काहीही अडत नाही, असे सध्याचे चित्र आहे. त्यामुळे दक्षिणेतून, बिहारमधून, उत्तर प्रदेशातून किंवा अगदी नेपाळमधून येणारे लोक स्थानिक भाषा न शिकता राहतात, याला त्यांच्यापेक्षा मराठी माणूसच कारणीभूत आहे, ही वस्तुस्थिती अमान्य करता येणार नाही. जेथे भीती असते, तेथे प्रीती नसते; यामुळे सक्ती असेल तर मराठी भाषेवर भक्ती बसेल, असे वाटण्याचे कारण नाही. मराठी लोकच जर मराठीच्या बाबतीत आग्रही असतील, तरच अन्य भाषकांना मराठी बोलण्यासाठी मराठी शिकावेसे वाटेल. आमच्यातील अल्पशिक्षित वर्ग अन्य भाषकांशी बोलताना हिंदी आणि सुशिक्षित वर्ग सर्रास इंग्रजीचा वापर करताना दिसतो. भाषा हे संवादाचे साधन आहे. जर हा संवाद अन्य भाषेतून होत असेल तर इतर भाषकांना दोष देता येत नाही. गेल्या काही वर्षांपासून तर मराठीच्या भवितव्याबाबत खूपच गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. 'मराठी ही राजभाषा असली तरी, तिच्या डोक्यावर राजमुकुट असला तरी, तिची वस्त्रे फाटलेली आहेत आणि केविलवाण्या अवस्थेत ती मंत्रालयासमोर उभी आहे,'या शब्दांत कविवर्य कुसुमाग्रज यांनी २१ वर्षांपूर्वी मराठी भाषेचे दु:ख जाहीरपणे मांडले होते. १९७९ मध्ये 'मराठी राजभाषा वर्ष' साजरे झाले. '१९८५ पर्यंत राज्यकारभाराच्या सर्व क्षेत्रांत अग्रक्रमाने मराठीचा वापर केला जाईल,'अशा घोषणाही झाल्या; परंतु आजवर हा विषय मागेच रेंगाळत आहे. हे महाराष्ट्रीय नेतृत्वाचे अपयश असले तरी मराठी माणूसही त्यास तेवढाच जबाबदार आहे.

(सकाळ वरून)

श्रद्धांजली

* नृत्यांदग्दशक कृष्णदेव मुळगंद

ज्येष्ठ नृत्यदिग्दर्शक, बालनाट्यलेखक व चित्रकार कृष्णदेव मुळगुंद (वय ९०) यांचे ११ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

'घाशीराम कोतवाल'च्या नृत्यदिग्दर्शनाने गाजलेले मुळगुंद चित्रकला, नृत्यकला, बालनाट्यलेखन आदी कलांच्या प्रांतात वावरत होते. त्यांचा जन्म २७ मे १९१३ रोजी झाला. पुण्यात कसबा पेठेत आणि नाशिकला त्यांचे बालपण गेले. चित्रकलेच्या आवडीने घरातून पळून जाऊन त्यांनी मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमधून चित्रकलेचे शिक्षण घेतले. १९३८ मध्ये तिथेच पदविका घेतली. त्यानंतर पुण्यात येऊन रेणुका स्वरूप शाळेत १९४० पासून ३३ वर्षे कलाशिक्षक म्हणून काम केले. १९४८ मध्ये आर्ट मास्टर पदवी मिळवली. चित्रकलेचे शिक्षण घेत असतनाच नटराज व रामगोपाल यांच्याकडे त्यांनी नृत्याचे धडे घेतले. उदयशंकर यांचे नृत्य पाहिल्यावर त्यांनाच गुरुस्थानी मानून त्यांनी एकलव्याप्रमाणे साधना केली.

लहानपणापासून नाट्यकलेकडेही त्यांचा ओढा होता. त्यांनी 'स्वराज्य ग्रहण' नाटक शाळेत असतानाच लिहिले. 'चार भिंती' हे त्यांचे नाटक नाट्यविलास संस्थेने आंतरशालेय स्पर्धेत केले. 'कुलदीप' या नाटकाची गीते त्याकाळातील नवोदित कवयित्री शांता शेळके यांच्याकडून लिहून घेतली होती. 'आपण कोण' हे नाटक नागेश जोशी यांनी दिग्दर्शित केले होते. 'कोणी कुणाचं नाही', 'घरमालक', 'कन्यारत्न', 'दिव्याखाली अंधेर', आदी दहा नाटके त्यांनी लिहिली.

'मंतरलेले पाणी' हे त्यांचे बालनाट्य १९६२ मधील. त्यानंतर 'जादुनगरीतील राजकन्या', 'सोन्याची वाटी', 'पाचूच्या बेटावर पाच रत्ने', 'राजपुत्र ठकसेन', 'अलिबाबा व चाळीस चोर' ही त्यांची बालनाट्ये प्रसिद्ध आहेत. स्मिता पाटील, रोहिणी हत्तंगडी, रवींद्र मंकणी, सुहास कुलकर्णी हे त्यांचे शिष्य अभिनय क्षेत्रात गाजले.

'घाशीराम कोतवाल' या नाटकासाठी त्यांनी केलेल्या नृत्यदिग्दर्शनाची खूप वाखाणणी झाली. त्यांनी राजदत्त यांचे 'आनंदवनभुवनी', बाबासाहेब पुरंदरे यांचे 'जाणता राजा', वि. वा. शिरवाडकर यांचे 'नंदनवन' या नाटकांचे केलेले नृत्यदिग्दर्शनही वेधक ठरले. 'पुजारिणी', 'महाश्वेता', 'उत्तररामचरित्रम्', 'महावीर चरित्रम्', 'शाकुंतल', 'कुमारसंभव', 'स्वप्नवासवदत्तम', 'रामायण', 'घडणारं अटळ तर कल्पनेला हरकत काय', 'यज्ञ' या नाटकांचे नृत्यदिग्दर्शन त्यांनी केले होते. 'नाचतो मी नाचतो' हे त्यांचे आत्मचरित्र प्रकाशित झाले आहे.

* प्राचार्य बी. बी. देशमुख

मराठी वाङ्मयाचे अभ्यासक प्राचार्य बलवंतराव बाबूराव देशमुख (वय ६७) यांचे ५ मे रोजी सातारा येथे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरोली हे त्यांचे मूळ गाव. गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. मराठी वाङ्मयाचे अभ्यासक, लेखक म्हणून ते परिचित होते. खटाव येथील महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीस सुरवात केली. गडहिंग्लज येथील त्यांचा प्राचार्यपदाचा काळ प्रभावी ठरला. गाजला.

* लोककवी वामनदादा कर्डक

'सांगा, आम्हाला बिर्ला बाटा टाटा कुठाय हो,
सांगा, धनाचा साठा न आमचा वाटा कुठाय हो'

यासारख्या शेकडो गीतांनी परिवर्तनवादी आणि आंबेडकरी विचार सशक्त करणाऱ्या लोककवी वामनदादा कर्डक यांचे १५ मे रोजी नाशिक येथे वार्धक्यामुळे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

परिवर्तनवादी आणि आंबेडकरी चळवळ हाच जणू परिवार बनला होता. वामनदादांनी लिहिलेली गीते लोक आजही तासन्तास तल्लीन होऊन ऐकतात.

'सांगा या वेडीला, माझ्या गुलछडीला,
हिच्यासाठी आलो मी सासुरवाडीला'

हे प्रसिद्ध गीत वामनदादांचे.

परंतु वामनदादांनी चित्रपटगीते लिहून पैसा कमविण्यापेक्षा चळवळीची गीते लिहिणे पसंत केले.

'स्वातंत्र्याचा अर्थ हा कळू द्या,
आता तरी गरिबाला घास मिळू द्या!'

यांसारखी अनेक आशयपूर्ण गीते वामनदादांच्या लेखणीतून बाहेर आली. आजही अनेक चळवळींतून ही गीते गायली जातात.

वामनदादांचा जन्म १५ ऑगस्ट १९२१ रोजी सिन्नर तालुक्यातील देशवंडी येथे झाला. लहानपणापासून त्यांना गायनाची आवड होती. त्यामुळे ते नोकरी वा व्यवसायात रममाण झाले नाहीत. त्याच कालावधीत डॉ. आंबेडकरांच्या परिवर्तन चळवळीने जोर धरला होता. या चळवळीत त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते. आपल्या पहाडी आवाजाने व मर्मभेदी गीतांनी परिवर्तन चळवळ खेड्यापाड्यातील जनसामान्यांच्या हृदयापर्यंत पोहोचविण्यात वामनदादांचा सिंहाचा वाटा होता. 'मोहोळ', वाटचाल, 'असा हा वामन' आदी त्यांची पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यांना युगांतर, मूकनायक व डॉ. आंबेडकर शताब्दी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

❐

बालनगरी

शाही बिल्ली	४४
सावली कोणाची	४९
थोडीशी गंमत	५०
ओळखा पाहू	५१
जांभळे पोपट	५२
स्पर्धा निकाल	५५

देशोदेशीच्या लोककथा

कझाक लोककथा

शाही बिल्ली

अनु. शंकर सारडा



कझाकस्तानच्या सुलतानाने नवे शहर वसविण्याची योजना आखली. कामावर येणाऱ्यांना ''एक वेळ खाना आणि दररोज एक मोहोर मजुरी मिळेल'' असे जाहीर केले. त्यामुळे गवंडी, बिगारी यांनी गर्दी केली. पुरेशी भरती झाल्यावर त्याने नवी मजूर भरती बंद केली.

त्याच वेळी सलमान तेथे आला आणि सुलतानाला म्हणाला, ''हुजूर, मलाही कामाला ठेवा.''

''आता नवीन भरती बंद. त्यामुळे तुला ठेवता येणार नाही.''

''हुजूर, मी वीस कोस चालत आलोय. मोठ्या आशेने आलोय.''

सुलतानाला दया आली. तो म्हणाला, ''तू लांबून आला आहेस. म्हणून तुला एक महिनाभर कामावर ठेवतो. पण तुला मजुरी मात्र महिन्याला एक मोहोर मिळेल. दोन वेळा पोटभर खाना मिळेल.''

दोन वेळचा पोटाचा प्रश्न सुटतोय; मजुरीवाचून काही अडणार नाही असा विचार करून सलमानने होकार दिला. गवंड्याच्या हाताखाली तो काम करू लागला. ''तुला सुलतानाने मजुरी फार कमी दिलीय. बाकीच्या मजुरांना महिन्याला तीस मोहोरा मिळणार. तुला फक्त एकच!'' म्हणून सगळे मजूर त्याच्याकडे सहानुभूतीने बघत.

एक महिना झाला, तेव्हा सुलतानाने त्याला ठरल्याप्रमाणे एक मोहोर दिली.''आजपासून तुला सुटी.'' असे म्हटले.

सलमान वेशीकडे निघाला. वाटेत बाजारपेठ लागली.

एक म्हातारी बाई एका थैलीत काहीतरी घेऊन बसली होती. सलमानने विचारले,''या थैलीत काय आहे?''

''शाही बिल्ली. उंदरांची कर्दनकाळ. हवीय का तुला? किंमत एक मोहोर फक्त.''

सलमानच्या मनात आले, घेऊन टाकू या मांजर. तेवढीच सोबत.

त्याने मोहोर दिली. म्हातारीकडून मांजराची थैली घेतली.

थोडं पुढं गेल्यावर त्याला एका गंजीजवळ हातात काठी घेतलेला मिया बेग दिसला. तो खूप वैतागलेला होता. गंजीच्या अवतीभवती उंदरांचा सुळसुळाट होता. त्या उंदरांमागे तो काठी घेऊन धावत होता. उंदरांना मारत होता. पण उंदीर महाचपळ! ते काठी खाली येण्याआधीच पसार होत होते. मिया बेग पार हैराण झाला होता.

सलमानने मिया बेगला विचारले,''काय तकलीफ आहे?''

''हे उंदीर... भयंकर वैताग आणलाय यांनी! उद्या गव्हाची मळणी करायचीय; म्हणून ढीग लावलाय. पण हे उंदीर सगळा गहू फस्त करतील अशी भीती वाटतेय.''

सलमान म्हणाला,''या उंदरांचा बंदोबस्त मी करतो. मला किती मोहरा देशील?''

''तुला किती हव्यात?''

''पन्नास.''

''ठीक आहे.''

सलमानने विचार केला; इतर मजुरांना एक महिन्याच्या तीस मोहरा मिळत होत्या. मला पन्नास मिळतील! म्हणजे फायदाच!

त्याने थैलीतून मांजराला बाहेर काढले. बिल्लीने एकेक उंदीर पकडून मटकावणे सुरू केले. त्यामुळे बरेच उंदीर घाबरून त्या गंजीपासून दूर पळाले.

थोड्याच वेळात गंजीजवळ नावालाही उंदीर उरला नाही.

मिया बेगने पन्नास मोहरा दिल्या. त्या घेऊन थैलीत शाही बिल्लीला टाकून सलमान पुढे निघाला.

त्याला एक हवेली दिसली. तेथे सुलतानाची एक बेगम राहत होती.

त्या हवेलीत काही नोकर लांब लांब काठ्या घेऊन उंदरांना पळवून लावत होते.

''काय चालले आहे?''

''हवेलीत उंदरांनी थैमान घातलेय. बेगम साहेबांचे भारी भारी कपडे कुरतडून टाकले आहेत. त्यामुळे त्या चिडल्या आहेत. म्हणून आम्ही उंदरांना पळवून लावतोय.''

''उंदीर असे नाही पळून जाणार. मी त्यांना पळवून लावीन. मला काय देणार?''

नोकरांनी सलमानला सुलतानाजवळ नेले. सुलतान म्हणाला, ''मी एक हजार मोहरा देईन.''

सलमानने आपले मांजर थैलीतून काढून उंदरांवर सोडले. मनीने दोनतीन उंदरांना पकडले. ते बघून बहुतेक उंदरांनी हवेलीतून पळ काढला.

त्या मांजराची ही कामगिरी बघून सुलतानाने सलमानला म्हटले, ''तुझे मांजर मला दे. कारण उंदीर बरेच आहेत. ते आज गेले असले तरी उद्या येणारच नाहीत, असे नाही. त्यामुळे हे मांजर हवेलीतच राहिले तर उंदीर येणारच नाहीत. त्याबद्दल मी तुला हवी ती किंमत देईन.''

सलमानने म्हटले,''मी येथून वीस कोसावरच्या खेड्यात राहतो. मला या शहरात राह्यचे आहे. एक चांगला बंगला मला द्या.''

सुलतानाने त्याला बंगला दिला. त्यात तो राह्यला गेला.

''मी माझ्या शाही बिल्लीलाही नवा बंगला दाखवून आणतो.'' असे सलमानने म्हटले.''मला हुकूम द्या.''

सुलतानाने तशी परवानगी दिली; शाही बिल्लीलाही नवा बंगला आवडला; पण कबूल केल्याप्रमाणे सलमानने त्याला बेगमच्या हवेलीत आणून सोडले.

बेगमच्या हवेलीतील सगळ्या उंदरांचा शाही बिल्लीने फडशा पाडला. तिथे नावालाही उंदीर उरला नाही. त्यामुळे शाही बिल्लीची उपासमार होऊ लागली. शाही बिल्ली बेगमच्या महालातील पलंगावर बेगमबरोबर मस्त लोळत बघताना बघून मात्र सुलतानाला राग आला.

''या बिल्लीला लगेच त्या सलमानच्या बंगल्यावर पोचवा.''त्याने नोकरांना हुकूम दिली.नोकरांची बिल्लीला सलमानच्या घरी पोचवले.सलमानने तिला उचलून कवेत घेतले.

तिला कुरवाळले.

सकाळच्या उन्हात बंगल्याच्या दरवाजावरच्या बुरुजावर बसून शाही बिल्ली कोवळ्या उन्हात आरामात अंग घुसळत पडे, तेव्हा तिची ऐट विचारूच नका.

एकदा सुलतानाचा दिवाण बंगल्याच्या जवळून घोड्यावर बसून चालला होता. शाही बिल्लीने नेमकी त्याच्या घोड्यावर उडी मारली. तो दचकला आणि घोड्यावरून एकदम खालीच जमिनीवर पडला. शाही बिल्ली मात्र घोड्यावर ऐटीत स्वार होऊन घोडा दौडवू लागली.

तो घोडा दौडत निघाला तो सुलतानाचा महाल आल्यावरच थांबला.

दिवाणाच्या घोड्यावर बसलेल्या शाही बिल्लीला बघून सुलतान एकदम घाबरला.''अरे, उंदरांचा कर्दनकाळ असणारी ही शाही बिल्ली आता माझ्या दिवाणालाही मारून आली की काय? आता आपली ही काही धडगत दिसत नाही.''

पण तेवढ्यात शाही बिल्लीने घोड्यावरून उडी मारून आपल्या मालकाच्या, सलमानच्या बंगल्याकडे धाव घेतली.

सलमानने तिला बघून म्हटले,''काय ग, दिवाणाला खाली जमिनीवर पाडलंस ना? बिचाऱ्याचा उजवा हातच मोडला की! सुलतान त्यामुळं फारच हादरलाय. आता मात्र तुझ्या खोड्या बंद कर! नाहीतर हे शहर सोडून आपल्याला खेड्यात जावे लागेल.''

''छे छे! मुळीच नाही. इथंच खरी मजा आहे. तुम्हाला सुलतान केल्याशिवाय मी खऱ्या अर्थाने शाही बिल्ली कशी ठरणार?''

सलमानच्या चेहऱ्यावर हास्य फुलले.

कोणती सावली कोणाची?





वर काही वस्तूंची चित्रे आहेत. त्यांच्या सावल्यांशी त्यांचे भांडण झाले आणि त्यांच्या सावल्या रुसून दुसऱ्या गोलात जाऊन बसल्या! कोणती सावली कोणाची ते ओळखा आणि योग्य जोड्या लावा

सर्वात प्रथम अचूक उत्तर पाठवणाऱ्या पहिल्या ३ मुलांना
छान छान चित्रांची आकर्षक २ पुस्तके बक्षीस!
मुदत १५ जुलै २००४पर्यंत!

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०

थोडीशी गंमत...



वरील तुकडे कापा आणि योग्य प्रकारे जोडा पहा कोणते चित्रं आहे ते!

उलटा पुलटा

खाली दिलेले शब्द एकदा सुलटे वाचा आणि एकदा उलटे वाचा पहा काय गंमत होते ती! तुम्हाला असे किती शब्द आठवतील?

राग	भजी			चला	पाढा		
लढा	रमा			गज	वारा		
मका	खाचा			रूपा	गवा		
बारा	राधा			तवा	राख		
खास	हार			रवी	ठसा		

	नट	सभा		क्षार	ठमी
	सर	चार		शान	रजा
	ताल	लाली		सडा	साप
	तमा	रती		कावा	टाचा
	नदी	वाचा		रड	राशी

ओळखा पाहू



वर दिलेल्या आकृतीत खूप वस्तू लपलेल्या आहेत. लपलेल्या वस्तू किती व कोणत्या ते ओळखा **सर्वात प्रथम अचूक उत्तर पाठवणाऱ्या पहिल्या ३ मुलांना छान छान चित्रांची आकर्षक २ पुस्तके बक्षीस!**

मुदत १५ जुलै २००४पर्यंत!

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०

जांभळे पोपट

शब्दांकन : सुनीता दांडेकर

स्पर्धा निकाल

मे २००४ अंकातील डोके चालवा स्पर्धा

अचूक उत्तर

तोंड-सिंहाचे, पाठ-उंटाची, शेपटी- वाघाची, पुढील पाय- घोड्याचे, मागील पाय- हत्तीचे.

यशस्वी स्पर्धक

१) **किरण धम,** ९४९, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे २
२) **तनुजा सनित निहाल,** ८३२, ई, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर
३) **मानसी अरविंद कटके,** १०, स्वानंद, अभिषेक नगर,मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००२

यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन!
तुमचे बक्षीस लवकरच पाठवत आहोत!

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

मेहता मराठी ग्रंथजगत

वर्गणीचे नूतनीकरण करा!

३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास आकर्षक भेट!

एक वर्षाची वर्गणी	तीन वर्षांची वर्गणी	पाच वर्षांची वर्गणी
१००रु.,	२००रु.	३००रु.



३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'आज इथे उद्या तिथे-वि. स. वाळिंबे'
हे ४५रु.चे पुस्तक भेट!पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'सागरतीरी - अनु. अंजनी नरवणे'
हे ८० रु.चे पुस्तक भेट!पोस्टेज २०रु.

वर्गणी पाठवण्याचा पत्ता :
मेहता मराठी ग्रंथजगत,
मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोनभवन समोर,
पुणे - ४११०३०. फोन - ४४७६९२४

सभासदांना आमच्या सर्व पुस्तकांवर २५ % सवलत!